


RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

# गोदातीर समाचार

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक ६८ * नांदेड * शुक्रवार, दि. १३ मार्च २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# गॅस सिलेंडर बुकिंगचा नियम बदलला

## ग्रामीण भागात ४५ दिवसांनी होणार बुकिंग तर शहरी भागात २५ दिवसांचा कालावधी

**मुंबई (प्रतिनिधी)–** पश्चिम आशियामध्ये सुरू असलेल्या युद्धाचा फटका आता भारतीय स्वयंपाक घराला बसत असल्याचं दिसतंय. याच पार्श्वभूमीवर एलपीजी गॅस पुरवठ्याबाबत निर्माण झालेल्या अनिश्चिततेच्या वातावरणात केंद्र सरकारने सिलेंडर बुकिंगच्या नियमांमध्ये मोठा बदल केला आहे. नव्या नियमानुसार, ग्रामीण भागात आता ४५ दिवसांनंतरच एलपीजी सिलेंडर बुक करता येणार आहे, तर शहरी भागात २५ दिवसांचे अंतर ठेवून बुकिंग करता येईल. केंद्रीय मंत्री हरदीप सिंह पुरी यांनी संसदेत ही माहिती दिली.

यापूर्वी देशभरात सिलेंडर बुकिंगसाठी २१ दिवसांचा कालावधी निश्चित होता, जो अलीकडे २५ दिवसांपर्यंत वाढवण्यात आला होता. आता ग्रामीण आणि शहरी, या दोन्ही भागांसाठी वेगवेगळी कालमर्यादा ठरवण्यात आली आहे.

नवीन व्यवस्थेनुसार ग्रामीण भागातील ग्राहकांना ४५ दिवसांनंतर दुसऱ्या सिलेंडरची बुकिंग करता येणार आहे, तर शहरी भागात २५ दिवसांचा कालावधी ठेवण्यात आला आहे. सरकारच्या मते, या निर्णयामुळे गॅस पुरवठ्यावर अचानक पडणारा दबाव कमी होण्यास मदत होईल.

गॅस टंचाईच्या अफवांमुळे अनेक ग्राहक गरजेपेक्षा आधीच सिलेंडर बुक करू लागले होते. जे ग्राहक आधी सुमारे ५५ दिवसांनी सिलेंडर बुक करत होते, ते आता फक्त १५ दिवसांच्या अंतराने बुकिंग करू लागले होते. यामुळे साठेबाजी आणि काळाबाजाराची शक्यता वाढली होती. याच पार्श्वभूमीवर बुकिंगमधील अंतर वाढवण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती केंद्र सरकारने दिली आहे.

केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंह पुरी यांनी संसदेत सांगितले की, देशात पेट्रोल, डिझेल किंवा एलपीजीचा कोणताही तुटवडा नाही. ब्लॅक मार्केटिंग रोखण्यासाठी सरकारने काही महत्त्वाचे उपाय केले आहेत.

लोकसभेत बोलताना हरदीप सिंह पुरी म्हणाले की, जगात सध्या ऊर्जा क्षेत्रात मोठा तणाव निर्माण झाला असला तरी भारताची कच्च्या तेलाची पुरवठा स्थिती सुरक्षित आहे. भारत अनेक देशांकडून कच्चे तेल खरेदी करत आहे, त्यामुळे देशातील ऊर्जा पुरवठा सुरळीत ठेवण्यात यश आले आहे असं ते म्हणाले.

एलपीजी संकटाच्या चर्चांवर प्रतिक्रिया देताना हरदीप पुरी यांनी सांगितलं की, गेल्या पाच दिवसांत एलपीजी उत्पादनात २८ टक्क्यांनी वाढ करण्यात आली आहे. ३३ कोटी भारतीय कुटुंबांच्या स्वयंपाकघरात गॅसची कमतरता भासू नये ही सरकारची प्राथमिकता असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

लोकसभेत विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी एलपीजीबाबत चिंता व्यक्त करत रेस्टॉरंट बंद होत असल्याचं आणि लहान व्यापाऱ्यांवर परिणाम होत असल्याचं सांगितलं. यावर उत्तर देताना हरदीप सिंह पुरी म्हणाले की, हा अफवा पसरवण्याचा किंवा चुकीची माहिती देण्याचा काळ नाही, आणि देशात गॅस पुरवठा सुरळीत असल्याचा त्यांनी पुनरुच्चार केला.

# नागरिकांनी कोणत्याही प्रकारे पॅनिक बुकिंग करु नये

## जिल्हा प्रशासनाचे आवाहन



**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात घरगुती गॅस सिलेंडरचा पुरवठा सुरळीतपणे सुरू असून नागरिकांनी कोणत्याही प्रकारे पॅनिक बुकिंग करु नये. तसेच गॅस एजन्सीच्या बाहेर अनावश्यक गर्दी करण्याची गरज नाही, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

घरगुती गॅसच्या नियंत्रणासाठी जिल्हा आणि तालुकास्तरावर कंट्रोल रूम तयार करण्यात येत आहे. नागरिकांनी यासंबंधी काही समस्या असल्यास जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मो. नंबर ८६६८२२३३२६ या व्हॉटसप Chat Bot नंबरवर पाठवाव्यात. नांदेड जिल्ह्यात कोणीही घरगुती गॅसचा गैरवापर, काळाबाजार करत असल्याचे निदर्शनास आल्यास त्याबाबतची तक्रार तात्काळ वर दिलेल्या नंबरवर द्यावी, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी नांदेड यांनी केले आहे.

# नांदेडमध्ये ४ हजार २५० कोटींचा 'हेलीप्लांट' साकारणार!

- खा. अशोकराव चव्हाण यांची माहिती
- दीड ते दोन हजार नोकऱ्या उपलब्ध होणार

**नांदेड (प्रतिनिधी)–** निवडणुकीत नांदेडकरांनी कमळाची काळजी करावी, त्यानंतर पुढील पाच वर्षे नांदेडची चिंता मी करेन, असा शब्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेच्या निवडणूक प्रचारात दिला होता. नांदेडला तब्बल ४ हजार २५० कोटी रुपयांचा हेलीप्लांट प्रकल्प देऊन मुख्यमंत्र्यांनी आपला शब्द खरा करून दाखवल्याचे खा. अशोकराव चव्हाण यांनी म्हटले आहे.



मुख्यमंत्र्यांनी बुधवारी विधानसभेत बोलताना नांदेडमध्ये ४ हजार २५० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा सामंजस्य करार होत असल्याची घोषणा केली होती. या महत्वपूर्ण प्रकल्पाबाबत अधिक माहिती देताना खा. अशोकराव चव्हाण म्हणाले की, राज्य सरकारने 'रिटाव्हिया प्रायव्हेट लिमिटेड' सोबत हा महत्वपूर्ण करार केला आहे. या कराराअंतर्गत नांदेडमध्ये हेलिकॉप्टर निर्मिती, जुळवणी आणि सुट्या भागांच्या उत्पादनाचा प्रकल्प उभारला जाणार आहे. तसेच, हेलिकॉप्टरसाठी आवश्यक अभियांत्रिकी सेवा आणि देखभाल व दुरुस्ती सेवा देखील या ठिकाणी उपलब्ध असतील. या प्रकल्पामुळे १ हजार ८०० ते २ हजार थेट नोकऱ्या निर्माण होतीलच, शिवाय मोठ्या प्रमाणावर अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊन जिल्ह्याच्या आर्थिक विकासात अधिक भर पडेल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मेक इन इंडिया' आणि 'विकसित भारत' या संकल्पनेत महाराष्ट्राचे योगदान सर्वाधिक असावे, या ध्येयाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस झपाट्याने काम करत आहेत. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक येत असून, नांदेडचा हेलीप्लांट प्रकल्प हे त्याचेच फलित असल्याचेही खा. अशोकराव चव्हाण यांनी म्हटले आहे.

# नांदेडमध्ये चार जणांविरूद्ध वीज चोरीप्रकरणी कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** वीज चोरी विरुध्द महावितरणतर्फे मोहीम तीव्र करण्यात आली असून थेट पोलीस कारवाया करण्यात येत आहेत. नांदेड शहरातही शनिवारी नांदेड शहर पोलीस ठाण्यात विद्युत वाहिनीवर आकडे टाकून वीजचोरी केल्या प्रकरणी चार जणांविरुध्द गुन्हे दाखल झाले आहेत.

आकडे टाकून वीज चोरी करणाऱ्यांमध्ये सौ.मुक्ताबाई नरवाडे रा.प्रभातनगर, सोनसळे आनंदा अर्जूनराव रा.प्रभातनगर, माधव नागोराव भगत रा.विवेकनगर, इंगोले संभाजी लक्ष्मण रा.जंगमवाडी यांचा समावेश आहे. त्यांच्यावर शहर पोलीस ठाण्यात भारतीय विद्युत कायदा २००३ च्या कलम १३५ नुसार कारवाई सुरु आहे.

यातील सौ.मुक्ताबाई नरवाडे यांच्याकडे १३८३० रुपयांचे बिल थकीत असून त्यांना वीज चोरीचे १२००० रुपयांचे बिल देण्यात आले आहे. सोनसळे आनंदा यांच्याकडे ३९४३० रुपयांचे बिल थकीत असून त्यांना चोरुन वीज वापरल्या प्रकरणी १८ हजार रुपये बिलाची आकारणी करण्यात आली. माधवराव नागोराव भगत यांच्याकडे दोन वीज जोडण्यांची एकूण १ लाख २४ हजार १८० रुपयांची थकबाकी असून त्यांना वीज चोरीचे ४२ हजार रुपयांचे बिल आकारण्यात आले आहे. तर इंगोले संभाजी लक्ष्मण यांच्याकडेही एक लाख ७१० रुपयांची थकबाकी असून त्यांना २८ हजार रुपयांचे वीज चोरीचे बिल आकारण्यात आले आहे.

# क्रूझर-दुचाकीची भीषण धडक; दोघांचा मृत्यू

## गोदा वेअर हाऊससमोर कंदकुर्ती रोडवरवरील घटना

**धर्माबाद (प्रतिनिधी)–** शहरातील गोदा वेअरहाऊस समोर कंदकुर्ती रोडवर क्रूझर वाहन आणि दुचाकी यांच्यात झालेल्या भीषण अपघातात दोन जणांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.




मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, कंदकुर्ती रोडवर क्रूझर वाहन व दुचाकी यांच्यात जोरदार धडक झाली. या धडकेत दुचाकीवरील एका व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला. तर दुसरा गंभीर जखमी झाला होता. जखमी व्यक्तीला तात्काळ धर्माबाद येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र त्याची प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी त्याला निजामाबाद येथे हलवण्यात आले होते. तेथे उपचार सुरू असतानाच त्या व्यक्तीचाही मृत्यू झाल्याची माहिती मिळाली आहे.

अपघातात मृत्यू पावलेले दोन्ही व्यक्ती नायगाव (ध) तालुका धर्माबाद येथील रहिवासी असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, ही बातमी लिहीपर्यंत संबंधित अपघाताबाबत धर्माबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला नव्हता.

# ग्रामीण भागात गॅस तुटवड्याच्या अफवा

# १४० रूपयांचा सिलेंडर मिळतोय १६०० रूपयांना!

**शंकरनगर (प्रतिनिधी)–** शंकरनगर परिसरात स्वयंपाकाच्या गॅसचा तुटवडा असल्याच्या अफवा पसरवून काही विनापरवाना विक्रेत्यांकडून ग्राहकांची लूट होत असल्याचा प्रकार समोर आला आहे. साधारण ९४० रुपयांचा गॅस सिलेंडर तब्बल १६०० रुपयांना विकला जात असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे.

काही मोठ्या एजन्सीकडून खेड्यापाड्यातील किराणा दुकाने, पानपट्ट्या आदी ठिकाणी विनापरवाना विक्रेत्यांना सिलेंडर उपलब्ध करून दिले जात असल्याचा आरोपही नागरिकांनी केला आहे. याचा फायदा घेत काही विक्रेते ग्रामीण भागातील शेतकरी व सामान्य ग्राहकांना जादा दराने गॅस विक्री करत असल्याचे दिसून येत आहे.

दरम्यान, इस्त्रायल-अमेरिका व इराण यांच्यातील तणावामुळे गॅस तुटवडा निर्माण झाला, असा बनाव करून ग्राहकांमध्ये भीती पसरवली जात असल्याचेही सांगितले जाते. मात्र बिलोली तालुक्यातील गॅस एजन्सीचे तालुक्यात गॅसचा कोणताही तुटवडा नसून सर्व ग्राहकांना बुकिंगनुसार घरपोच सिलेंडर पुरवठा नियमित सुरू असल्याचे स्पष्ट केले.

तसेच अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत एजन्सीकडूनच गॅस घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, जादा दराने विक्री करणाऱ्या विनापरवाना विक्रेत्यांवर ग्रामीण भागात गॅसचा कृत्रिम तुटवडा निर्माण करून जादा दराने सिलेंडर विक्री करणाऱ्या विनापरवाना विक्रेत्यांवर तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी शंकरनगर परिसरातील नागरिकांकडून होत आहे. ९४० रुपयांची गॅस टाकी १६०० रुपयांना विक्री करून सामान्य ग्राहकांची आर्थिक लूट केली जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. त्यामुळे पुरवठा विभाग, तहसील प्रशासन आणि गॅस कंपनीच्या अधिकाऱ्यांनी संयुक्त तपासणी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी व्यक्त केली आहे. तसेच खेड्यापाड्यात सुरू असलेल्या अशा विनापरवाना गॅस विक्रीवर तात्काळ बंदी घालावी, असेही नागरिकांनी म्हटले आहे.

# पोलीस उपमहानिरीक्षकांच्या पथकाकडून २ कोटी रुपयांचे साहित्य व वाळू जप्त

## नांदेडमध्ये अवैध वाळूविरुध्द कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेडमध्ये अवैध वाळूविरूद्ध कारवाई करत पोलीस उपमहानिरीक्षक पथकाकडून २ कोटी रूपयांचे साहित्य व वाळू जप्त करण्यात आली आहे.

नांदेड जिल्ह्यातील अवैध रेती उत्खनन व वाहतुकीविरुद्ध कारवाई करण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पथकास उस्माननगर पोलीस ठाणे हद्दीतील मौजे कौडगांव शिवारात पाठविले होते. सदर पथकाने, दि. १२ मार्च २०२६ रोजी रात्री ८.०० वा. दरम्यान कौडगांव शिवारातील वाळू धक्कयावर कारवाई केली असता, सदर ठिकाणी इंजिन बोटच्या माध्यमातून नदी पात्रातून वाळू उपसा होत असल्याचे व सदर वाळू एका फायबर बोटीतून नदीकिनारी आणली जात असल्याचे निदर्शनास आले.



सदर कारवाईत पथकाने, भारत बेंज कंपनीचे (५) हायवा, टाटा कंपनीचे एक टिपर, दोन पोकलेन मशीन, एक इंजिन बोट, एक फायबर बोट यांच्यासहित, नदीपात्रातून बाहेर काढून ठेवलेली (५५) ब्रास वाळू, असा एकूण २ कोटी ०४ लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमूद प्रकरणात पोलीस ठाणे उस्माननगर येथे (०९) आरोपीतांविरुद्ध गुरनं ५३/२०२६ कलम ३०३ (२), ३(५) भा.न्या.सं. सह कलम ४, २१ खाण व खनिज अधिनियम, १९५७ सह कलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, वाळू उपसा करण्यासाठीच्या बोटी नष्ट करण्यात आल्या आहेत.

सदर प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक गजानन गाडेकर हे करत आहेत.

सदर कारवाईमुळे, कौडगांव येथील गोदावरी नदी पात्रातून मोठ्या प्रमाणावर अवैधरित्या वाळू उपसा व वाहतूक होत असल्याचे निदर्शनास आले असून, उपसा केलेली वाळू नांदेड जिल्हयासह शेजारील जिल्हयांमध्ये पुरवठा होत असल्याची बाब स्पष्ट झाली आहे. सदर कारवाईत, पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह पोहेकॉ प्रदिप खानसोळे, पोहेकॉ संजीव जिंकलवाड, पोकॉ गणेश धुमाळ व पोकॉ कामाजी गवळी यांनी सहभाग घेतला.

# झरी खदानीजवळ ३६ जिवंत काडतुसं जप्त; दोघांना पकडले, १ आरोपी फरार




**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** अवैधरित्या काडतुसं विक्रीसाठी सौदेबाजी करण्याच्या प्रयत्नात असलेल्या दोन आरोपींना नांदेड ग्रामीण पोलिसांनी पकडले. या कारवाईत ३६ जिवंत काडतुसं जप्त करण्यात आले. एवढ्या मोठ्या प्रमाणात जिवंत काडतुसं जप्त करण्यात आल्याने खळबळ उडाली आहे. यामागे अवैध शस्त्र खरेदी-विक्रीचे मोठे रॅकेट असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

नांदेड शहरासह जिल्ह्यात गावठी पिस्तूल आणि काडतुसचा अवैध वापर वाढला आहे. काही आरोपी याचा काळाबाजार करत आहेत. या अनुषंगाने नांदेड ग्रामीण पोलिसांनी काही आरोपी शस्त्र, काडतुसच्या खरेदी-विक्री व्यवहार करण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठामागील झरी खदानजवळ येणार असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. यानुसार पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी त्या ठिकाणी पोलीस पथक रवाना केले. दि. ११ मार्च रोजी रात्री १० वाजता पथकाने छापा मारला.

यावेळी शौनक गुलाब शिंदे (वय १९, रा.ए. को. डब्ल्यू. अपार्टमेन्ट सहयोग कॅम्पस विष्णुपुरी), जावेद रहेमत शेख (वय २०, रा. जामा मस्जिदजवळ, विष्णुपुरी) आणि आनंद उर्फ चिन्नु सरदार यादव (वय २४ वर्ष रा. वजिराबाद) हे दबा धरून बसले होते. यातील २ आरोपींना पकडण्यात आले मात्र एक आरोपी पळून गेला. या आरोपींची अंगझडती घेतली असता पितळ व तांबा धातुचे ३६ जिवंत काडतुस किंमत १ लाख ८ हजार रुपयांचा मुद्देमाल मिळून आला. सदरचा मुद्देमाल जप्त करुन आरोपींना सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे. सदर आरोपींनी काडतुसं कुठून आणले, कोणाला विकले किंवा विकणार होते. यापूर्वी शस्त्र कोणाला विकली यांच्या सोबत अजून कोण सहभागी आहे का याचा तपास करण्यात येत आहे.

उपविभागीय पोलीस अधिकारी (इतवारा) प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, पोउपनि व्यंकट कुसमे, स्वनील साळुंके, अंमलदार वसंत केंद्रे, मारोती पंचलिंग, सचिन चावरे, समीर अहमद, शंकर माळगे, जमीर शेख धम्मपाल कांबळे, सिफ शेख, शिवानंद तेजवंद, माधव पालीमकर, विनोद पवार संजय मेकलवाड, राजेंद्र सितोकर सायबर विभाग, नांदेड यांच्या पथकाने ही कारवाई केली. सदर गुन्हयाचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक बाबुराव चव्हाण करत असून आरोपीतांना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना पोलीस कोठडीत पाठवले आहे.




# गॅस दरवाढ व टंचाईविरोधात काँग्रेसचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने

**नांदेड (प्रतिनिधी)–** देशात गॅस दरवाढ व त्याच्या टंचाईविरोधात काँग्रेस पक्षाकडून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली.

यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष राजेश पावडे म्हणाले की, देशात येणारा अधिकाधिक घरगुती गॅस पुरवठा हा इराणच्या स्टेट ऑफ हारमोस मधून होत असतो. सध्या मित्र देशांना तेथून पुरवठा सुरळीत सुरू आहे. मात्र इराण अमेरिका युद्धात, भारताने तटस्थ भुमिका घेण्याऐवजी अमेरिकेचे बाजू घेतल्यामुळे इराणच्या स्टेट ऑफ हारमोस मधून भारताचा गॅस पुरवठा कपात करण्यात आला आहे. यामुळे देशभर गॅस सिलेंडरची टंचाई सुरु झाली आहे. यावरून हे स्पष्ट होत आहे की, केंद्र सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे गॅस सिलेंडर दरवाढ व टंचाई झाली आहे.




या आंदोलनात उत्तर जिल्हाध्यक्ष राजेश पावडे, डॉ. श्रावण रॅपनवाड, सुरेंद्र घोडजकर, आनंद चव्हाण, सत्यपाल सावंत, केदार पाटील साळुंखे, अब्दुल गफार, आनंदा गुंडले, आनंदराव कल्याणकर, महेश देशमुख तरोडेकर, बालाजी चव्हाण, मुन्ना अब्बास, सुरेश हटकर, विठ्ठल पावडे प्रताप देशमुख बारडकर, मधूकर दिघे, रमेश गोडबोले, संजय वाघमारे, बापूसाहेब पाटील, अभिलाष पावडे, संदीप देशमुख, बालासाहेब देशमुख, गिरीश कोतावार, कुमार कुर्तडीकर, गगन यादव, दीपकसिंग हुजेरिया, गणेश पाटील, सतिश पाटील, गोविंद पाटील, सुभाष लोणे, माधवराव पवळे, अनिल पाटील चिमेगावकर, अंबादास रातोळे, इंजि. नसिम पठाण, आदीसह इतर पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी केंद्र सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. तसेच दरवाढ मागे घ्यावी असे निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात आले.

**जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे**
**शहाणे करूनी सोडावे, सकळ जन**
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
**गोदातीर समाचार**
**संपादक**
**केशव घोणसे पाटील**

# पाणी रे पाणी, तेरा रंग कैसा...!

पाणी म्हणजे जीवन. मानवी आरोग्य, स्वच्छता आणि समाजाच्या सर्वांगीण विकासाचा पाया म्हणजे शुद्ध पाणी. परंतु अलीकडच्या काही वर्षांत पिण्याच्या पाण्याच्या बाबतीत एक चिंताजनक प्रवृत्ती दिसून येत आहे. गावागावांत आणि शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर 'जार पाणी' वापरले जात आहे. आरओ किंवा फिल्टर केलेले शुद्ध पाणी असल्याच्या नावाखाली नागरिकांना जारमधून पाणी विकले जाते; परंतु प्रत्यक्षात त्या पाण्याची शुद्धता किती आहे, हा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. पैसे मोजून नागरिक आरोग्य विकत घेत आहेत की आजार, याचा विचार करण्याची वेळ आता आली आहे. पूर्वी घरातील विहीर, नळयोजना किंवा सार्वजनिक पाण्याच्या स्रोतांवर लोक अवलंबून होते. मात्र भूजलातील वाढती क्षारता, दूषित पाणी आणि पाणीपुरवठ्यातील अनियमितता यामुळे नागरिकांनी पर्याय म्हणून आरओ जार पाण्याकडे वळणे सुरू केले. आज परिस्थिती अशी आहे की, शहरांसोबतच ग्रामीण भागातही पिण्याच्या पाण्यासाठी जार पाण्यावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून राहिले जाते. लग्नसमारंभ, सामाजिक कार्यक्रम, हॉटेल, कार्यालये आणि घरांमध्येही जार पाणी सहजपणे वापरले जाते. परंतु या सोयीमागे मोठे आरोग्यधोके लपलेले असण्याची शक्यता दुर्लक्षित करता येत नाही. अनेक ठिकाणी आरओ प्लांट असल्याचे सांगून प्रत्यक्षात विहिरीचे किंवा बोअरवेलचे पाणी जारमध्ये भरून विक्री केले जात असल्याचा प्रकार समोर येत आहे. विशेषतः लग्नसराईच्या हंगामात या प्रकाराला अधिक उधाण येते. एका लग्नसमारंभासाठी २०० ते २५० जार पाणी मागविले जाते. प्रत्येक जारसाठी २० ते २५ रुपये मोजले जातात. म्हणजेच हजारो रुपयांचा व्यवहार होतो. मात्र त्या पाण्याची गुणवत्ता तपासली जाते का? अन्न आणि औषध प्रशासनाचे अधिकारी झोपेत आहेत का? किंवा त्यांचे हात याच्या खाली दबल्या गेलेत का? लोक आरओ पाणी आहे या विश्वासावर ते पाणी पितात, परंतु प्रत्यक्षात ते पाणी किती सुरक्षित आहे याची कोणतीही खात्री नसते. आरओ पाण्याची शुद्धीकरण प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची असते. त्यामध्ये विविध प्रकारचे फिल्टर, टीडीएसचे प्रमाण, तसेच वेळोवेळी फिल्टर बदलणे आवश्यक असते. बोअरवेल किंवा भूजलामध्ये माती, लोह, क्षार आणि इतर घटक असतात. त्यामुळे त्याचे योग्य पद्धतीने शुद्धीकरण न झाल्यास ते पाणी आरोग्यासाठी घातक ठरू शकते. क्षारयुक्त पाणी दीर्घकाळ पिल्यास मूत्रपिंडाचे विकार, पचनसंस्थेचे त्रास आणि इतर शारीरिक व्याधी निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे जार पाण्याच्या शुद्धतेबाबतची खात्री असणे अत्यावश्यक आहे. या संदर्भात सर्वात मोठी समस्या म्हणजे नियंत्रण आणि तपासणी यंत्रणेचा अभाव. जिल्ह्यात सुमारे पाचशेच्या आसपास आरओ प्लांट असल्याचे सांगितले जाते. मात्र त्यापैकी किती प्लांट नियमांनुसार चालतात, किती ठिकाणी नियमित तपासणी होते आणि किती ठिकाणी कारवाई झाली आहे, याबाबत स्पष्ट माहिती उपलब्ध नाही. अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी सांगतात की, जार पाण्याची तपासणी करण्याचा अधिकार त्यांच्याकडे नाही; तर स्थानिक स्वराज्य संस्थांनी पाण्याचे नमुने तपासून कारवाई करावी लागते. परिणामी जबाबदारी एकमेकांवर ढकलली जाते आणि प्रत्यक्षात नागरिकांचे आरोग्य धोक्यात येते. नगरपालिका, महानगरपालिका आणि ग्रामपंचायती यांनी या विषयाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. ज्या ठिकाणी आरओ प्लांट चालविले जातात, त्यांना परवाना देताना कठोर निकष लावणे आवश्यक आहे. पण पाकीट दिल्यावर सर्व नियम आपोआपच बाष्पीभूत होतात. नियमित तपासणी, पाण्याचे नमुने चाचणीसाठी पाठविणे, तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे ही स्थानिक प्रशासनाची जबाबदारी आहे. त्याचबरोबर जार पाण्यावर स्पष्ट लेबल, उत्पादनाची तारीख, स्रोत आणि शुद्धीकरणाची माहिती देणे अनिवार्य करणे आवश्यक आहे. याचबरोबर नागरिकांची जागरूकताही तितकीच महत्त्वाची आहे. केवळ जारमध्ये पाणी आले म्हणून ते शुद्ध आहे, असा समज ठेवणे धोकादायक आहे. पाणी पुरवठादारांकडून पाण्याचा स्रोत, आरओ प्लांटची माहिती आणि गुणवत्ता तपासणीची खात्री नागरिकांनी मागितली पाहिजे. ग्राहक म्हणून आपला हक्क ओळखून जागरूक राहणे आवश्यक आहे. शुद्ध पाणी हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत हक्क आहे. त्या हक्काच्या नावाखाली जर कुणी आरोग्याशी खेळ करत असेल, तर ते गंभीर गुन्हा मानला पाहिजे. पाण्याच्या व्यवसायामध्ये पारदर्शकता आणि कठोर नियंत्रण आवश्यक आहे. प्रशासनाने तातडीने तपासणी मोहीम राबवून नियमभंग करणाऱ्यांवर कारवाई करावी अन्यथा 'आरओ'च्या नावाखाली सुरू असलेला हा पाण्याचा व्यापार नागरिकांच्या आरोग्यासाठी मोठा धोका ठरेल.

# आत्मिक बळ एक जीवनमंत्र



स्वामी विवेकानंद आपल्या मित्रांशी मुक्त चर्चा करतांना म्हणाले, गुरूदेव रामकृष्णाचे चरित्र लोकांना कळाले पाहिजे. लोकांमधील संकुचित, स्वार्थी वृती नाहीशी झाल्यावर प्रत्येक संकटावर मात करण्याचे सामर्थ्य त्यांच्या अंगी येईल.लोकांना राम कृष्णाच्या चरित्रातून जे आत्मिक बळ मिळेल त्यातून त्यांच्या प्रश्नाची उत्तरे त्यांना मिळतील. केवळ व्याख्याने ऐकूण काहीच होणार नाही.व्याख्यान ऐकूण लोक टाळ्या वाजवतात आणि माना डोलवतात. खूपच छान! असे म्हणून जेवणासोबत विचार पचवून साफ करण्याचे सामर्थ्य आपल्या भारतीय बांधवात प्रचंड आहे.परीणामस्वरूप कृतिशून्य जीवन जगण्यात धन्यता मानणाऱ्या आमच्या बांधवात जोपर्यंत आध्यात्मिक विचार व विवेकवाद रुजणार नाही. तोपर्यंत केवळ व्याख्याणाने काहीच साध्य होणार नाही. हे प्रखर वास्तव मांडणारे विवेकानंद केवळ आपल्या मित्रांची वैचारीक उंची वाढवितात असे नव्हे तर समस्त युवापिढीला एक जीवनमंत्र देतात.

भारतीय माणसाच्या प्रवृतीचे अचूक वर्णन करुन त्यावर प्रहार करण्याचे काम त्यांनी खुपच मार्मिकपणे केले.गंजलेल्या लोखंडावर कितिही प्रहार केले तरी त्याचा काहीही उपयोग होत नाही. त्याला अगोदर विस्तवात टाकुन लाल होईपर्यंत तापविले पाहिजे. त्यानंतर त्याला हवा तसा आकार देणे शक्य होते.संस्काराचेही असेच आहे. केवळ हवेत विरून जाणारे विचार मांडून काहीच उपयोग नाही.युवा शक्तीचे हृदयपरिवर्तन त्यांना खूप महत्वाचे वाटत होते. त्यामुळे समर्पित जीवन जगणाऱ्या तरूणांच्या जीवनाला आकार देणे, त्यांना संस्कार देणे शक्य झाले की त्यांच्यात राष्ट्रभक्ती निर्माण करणे कठिण नाही.विधायक कार्यकर्त्याची मानसिकताच अपेक्षित फलप्राप्ती मिळवून देऊ शकते. त्याचे सकारात्मक परिणाम समाज, राष्ट्र आणि समस्त मानवी जीवनाला प्राप्त होतील. देशबांधवांना खरा धर्म, राष्ट्रप्रेम आणि जिवसृष्टीवरील प्रेम निर्माण करण्यासाठी मनुष्य शक्ती कार्यरत करणे हे आध्यात्माचे खरे कार्य.त्या साठी रामकृष्णाचे चरित्र लोकांना कळाले पाहिजे. आम्ही खूप सात्विकआहोत या गैरसमजातून निर्माण झालेला अंहकार आपल्या सर्वस्वाचा विनाश करतो. आपल्यातील लढाऊ वृती नष्ट करतो.आपल्यातील पतणाची जाणिव होत नाही. आत्मरिक्षणाचे महत्व समजत नाही.त्यामुळे सात्विकतेची भाषा फक्त आमच्या वाणीकक्षेत मर्यादित असते. त्यामुळे उक्ती व कृतीत महद्अंतर असते. क्षुद्र स्वार्थापायी समतोल गमावणारे बांधव अगणित दिसतात. कर्तृत्वशून्य जीवन जगून अखंड हरीनाम जपण्यात तरी काय अर्थ? सदाचारी पुतळ्यासमोर त्याच्या भगीनीवर होणारा अन्याय तो फक्त उघड्या डोळ्यानी पाहुनही प्रतिकार करण्याचे धारिष्ट गमाऊन बसला असेल, तर त्याची सात्विकता काय कामाची?षंडाच्या सात्विकतेला व सहिष्णूतेला अर्थ नसतो.

भूक शमवण्यापुरते अन्न ज्या देशात मिळत नाही,तिथे लोक धर्मपालन कसे करणार?लोकांच्या मूलभूत गरजा एकदा पूर्ण होऊ लागल्या की त्यांच्या मध्ये धर्माभिमान रूजविता येईल. शिवाय आपल्या बांधवांची मनोवृती खूप विचित्र आहे.एखादा गोरा विदेशी येऊन जर आम्हाला आमच्या धर्माविषयी सांगू लागला तर आम्ही खूप हुरळून जातो, पण आमचा एखादा फाटका सन्यासी त्याच्यापेक्षा खूप अभ्यास पूर्ण आणि अतिशय तळमळीने सांगत असेल तरी त्याचा शब्दाला आम्ही मान देतो का?अशी उदा. देऊन आपल्या गुलाम मानसिकतेवर आत्मपरिक्षण करायला ते भाग पाडत. ते अतिशय आत्मविश्वासाने एक गोष्ट सांगत. जेंव्हा माझे अनेक पाश्चात्य शिष्य त्यांच्या ज्ञानासोबत आपले आध्यात्मिक ज्ञान घेऊन भारतात येतील आणि येथील लोकांना सांगतील, तुमचा धर्म, त्यातील ज्ञान, तुमचे शिष्टाचार तुमच्या तील नितिमत्ता या सर्व बाबींना तुम्ही कमी का समजता?आम्ही तुमचा धर्म श्रैष्ठ समजतो. जेंव्हा ते असे आपल्याला सांगतील, तेंव्हा आपल्या देशातील प्रतिष्ठित, गर्भश्रीमंत लोक निमूटपणे ऐकतील आणि खरे ज्ञान ग्रहण करण्याचा सर्व–सामान्याचा मार्ग खुला होईल. भगिनी निवेदिता आणि अन्य शिष्यांच्या माध्य मातून ते काम करून घेण्याची सुरूवात त्यांनी केली होती. ते आपल्या देशात येऊन आपल्या धर्माचार्याच्या जागा घेतील.अशी शंका घेण्याचे मुळीच कारण नाही याची स्वामीजी खात्री देतं.

पाश्चात्य लोक अनेक बाबतीत आपला तिरस्कार करतात, याची कबुली देऊन स्वामीजी म्हणतात, आपल्या देशात अनेक वर्षापासून सवर्णानी दलित, आदिवासी लोकावर अन्याय कैला.त्यांना अक्षरश: पायाखाली तुडविले. माणूस म्हणून जगण्याचा त्यांचा अधिकार नाकारला.त्यामुळे पाश्चात्यांना नावे ठेवण्याचा आम्हाला अधिकार आहे का? त्यांच्यापेक्षा आम्ही आमच्या बांधवावर खूप अन्याय केला आहे. आमची जाती व वर्णव्यवस्था पाश्चात्याकडून आमच्यावर होणाऱ्या अन्यायापेक्षा अधिक अन्यायी आहे.या गुलामगिरीमुळे आमच्या देशबांधवाची एक कायम स्वरूपी मानसिकता बनलीआहे. त्या मानसिकतेत लाचारी इतकी घट्ट बसली आहे की भारतीय माणूस त्यामुळे आत्मभान विसरला आहे.स्वामीजी म्हणतात, गोऱ्या अधिकाऱ्याकडे नोकरी मागणारा भारतीय अर्ज लिहतो. हुजूर साहेबास विनंती की माझ्या घरी मला खायला मिळत नाही.माझी बायको व मुले भुकेने तडफडत आहेत.साहेब मी नम्र भावाने विनंती करतो की आपण माझी व माझ्या कुटुंबाच्या उदरभरणाची काहीतरी सोय लावून द्यावी. अन्यथा आमच्यावर भुकेने मरण्याची पाळी येईल. लेखी स्वरूपात आमच्या देशातील युवक आपली लाचारी या शब्दात कबुल करतात. या त्यांच्या विचारांचा आणि स्वाभिमाना–चा काही संबध असू शकतो का?

संघटना स्थापून सभा घेणे, नोकऱ्या मागत राहणे. दुष्काळापासून वाचविण्यासाठी ओरडत राहणे. सारखा द्या..द्या..चा आमचा नारा कधी संपणार? असे सारखे मागून कीती मिळणार? भिक मागत बसण्यापेक्षा स्वातंत्र मिळवून घेण्यासाठी आक्रमक व्हा.इंग्रजांच्या राजवटीत आलेल्या सुधारणांचे स्वागतही करा. त्या धोरणा–मुळे आपल्याला नेमके काय मिळाले यावर चिंतन करा. जो लोकशाहीवादी विचार त्यांनी आम्हाला दिला आहे. त्यामुळे येथील समस्त मानव सुखी होणार आहे,हे नाकबूल करता येणार नाही.आपल्या जवळ त्यांना देण्यासारखे एक असिम भांडार आहे.ते म्हणजे आपले आध्यात्म. मानवतेचा उच्च आदर्श भारतातून निर्माण झाला. वेदांताचे ज्ञान मिळविण्यासाठी आणि आपल्या सना तन धर्मातील गहन आंतरज्ञान शोधण्यासाठी इंग्रज भारतात आले आहेत. तुम्ही ही अमूल्य रत्ने त्यांना द्या. स्वामीजींच्या क्रांतीकारी विचाराला सनातन्यांनी प्रखर विरोध केला.त्यांचा विचार विवेकी युवकांनी मुळीच करू नये.ज्यांनी आपल्या देशातील चातुवर्णा ची भिंत जाणीवपूर्वक जोपासली. सामाजिक विषम तेची बिजं जणिवपूर्वक जोपासले, वाढवीले.मन्मनात उच्चनिचतेची भावना निर्माण केली.पिढ्यांनपिढ्या ती जीवंत ठेवली.त्यांना इंग्रजाना नावे ठेवण्याचा अधिकार आहे का? असा खडा सवालही त्यांनी केला होता. तेंव्हा आमचा धर्म व धर्मरक्षण याविषयी आम्ही नव्याने विचार केला पाहिजे. धर्म माणसासाठी आहे. धर्मासाठी माणूस नाही.धर्मातील नितीनियम हे धर्म ज्ञान सांगणाऱ्यासाठी सोयीचे आणि इतरासाठी गैरसोयीचे करण्यावर भर सर्वत्र दिसून येतो. आपले बुद्धीचातुर्य स्वस्वार्थासाठी वापरून इतरांची गैरसोय करणारे धर्मरक्षक सर्वसामान्यांना यामुळेच आपले वाटत नाहीत. त्यामुळे धर्मांतराचे प्रमाण वाढतआहे. सर्वच धर्मांतरे जबरदस्तीने झाली नाहीत. आज धर्म रक्षकांनी आत्मपरीक्षण करून आपली भूमिका बदलणे गरजेचे आहे. अपरिवर्तणीय विचार आम्हाला मानवतावादी विचारापर्यंत नेऊ शकत नाहीत. तो मानवतावादी धर्म वेगवेगळ्या देशातील सुधारणावाद्यांनी समजून सांगितला पाहिजे. जे जे या विश्वातील उदात्त आणि उत्तम आहे.ते ते आम्ही स्वीकारले पाहिजे. स्वामीजींनी त्यांच्या जगभ्रमंतीचा उद्देश आपल्या विवेचनातून स्पष्ट केला. कुपमंडूक प्रवृतीने आपल्या धर्माचे खूप अधपतन केले आहे. जेवढा आमचा दृष्टीकोन उदात्त तेवढा आमचा धर्म महान. या अनुषंघाने उगवत्या पिढीने अधिक चिंतन शील होणे ही काळाची गरज आहे.

**–प्रा. वसंत गिरी**
मेहकर, जि. बुलडाणा
मो. ९०११२२९२३२

# विकलांग आणि त्यांच्या समस्या



आज आपण पाहतो की, रस्त्यारस्त्यांवर वा मंदिर परिसरात आपल्याला काही लोकं भीक मागताना दिसतात. त्यात वयोवृद्ध व काही विकलांग लोकं असतात. विकलांग याचा अर्थ मतीमंद (वेडसर), आंधळे, अपंग (लंगडे), मुके, बहिरे. का त्यांचं विकलांग असणं हा शाप आहे काय? यावर लिहिलेला एक विशेष लेख.

विकलांग बाळ. विकलांग या गटात अनेक प्रकार मोडतात. ज्यांना बरोबर बोलता येत नाही. म्हणजेच ज्यांच्यात वाचा दोष आहे. ज्यांना बरोबर ऐकता येत नाही. म्हणजेच कर्णदोष आहे. ज्यांना बरोबर डोळ्यांना दिसत नाही. दृष्टिदोष आहेत. ज्यांना बरोबर चालता येत नाही. म्हणजेच जे अस्थीव्यंग आहेत. तसंच ज्यांची बरोबर बुद्धी विकसित नाही. ते मतीमंद. मतीमंद असणं हा एक अभिशापच मानवी जीवनाला लागलेला आहे. मतीमंद बाळ होणं हा काय जन्म घेणाऱ्या बाळाचा गुन्हा असतो काय किंवा विकलांग बाळ जन्माला येणं हा तरी त्या बाळाचा गुन्हा असतो काय? तर याचं उत्तर नाही असंच आहे. मतीमंद बाळ निपजणं हा बाळाचा गुन्हा नाही वा विकलांग बाळ जन्माला येणं हाही बाळाचा गुन्हा नाही.

मतीमंद बाळ याचा अर्थ असा की, ते असे बाळ की ज्या बाळाचे सर्व अवयव हे सक्षम असतात. त्यांना बरोबर ऐकायला येतं. बरोबर पाहता येतं. मात्र बुद्धी तेवढी सक्षम नसते, असे बाळ. विकलांग या प्रकारात हे सर्व दोष मोडत असतात. तसंच हे दोष कोणत्याही व्यक्तीला असू नयेत. कारण असे दोष ज्या व्यक्ती–मध्ये असतात त्या लोकांवर त्यांचा मुळातच दोष नसतांनाही दोषारोपन केलं जातं. कोणी तर त्यांना मागील जन्माच्या पापाचा परिणाम मानतात. म्हणतात की, मागील जन्मात पाप केलं असेल, म्हणून हा असला जन्म मिळाला.

हे सर्वच दोष वाईटच. हे दोष कोणात असू नयेत. परंतु त्याहीपेक्षा सर्वात वाईट दोष मतीमंद असणं. कारण आंधळा, मुका, बहिरा, अस्थीव्यंग या सर्व प्रकारात सर्वच व्यक्तींचा मेंदू शाबूत असतो. त्यामुळं अशा व्यक्तीला घर परिवारानं कुठंही नेवून सोडून दिल्यास तो व्यक्ती परत आपल्या घरी येवू शकतो किंवा ज्यांनी कोणी त्याला जिथं सोडून दिलं त्याला तो पोलिसात तक्रार देवून धडा शिकवू शकतो. परंतु मतीमंद या प्रकारात त्या व्यक्तीचा मेंदूच शाबूत नसतो. त्यामुळं त्याला कोणीही कुठंही सोडून दिलं तर तो व्यक्ती ज्या व्यक्तीनं सोडून दिलं, त्याची पोलिसात तक्रार दाखल करून त्याला धडा शिकवू शकत नाही वा तो व्यक्ती परत आपल्या घरी येवू शकत नाही.

मतीमंद या प्रकाराला पर्यायानं सांगायचं झाल्यास वेडसर व्यक्ती म्हणता येईल. वेडेपणा हा व्यक्तीच्या अंगात कधी जन्मापासूनच असतो. म्हणजेच काही व्यक्ती जन्मापासूनच वेड्या असतात तर काही व्यक्ती या जीवनाच्या कोणत्याही वयात वेड्या होवू शकतात. त्या वेडेपणाला वेळ व काळ लागत नाही. बाकी दोषाचं मात्र असं नाही. क्वचितच प्रसंगी तसे दोष उद्भवू शकतात. शारीरिक विकलांगता हा काही दोष. या दोषावर लोकं दोषारोपण करतात. तसंच त्या विकलांगपणाला शाप समजतात. त्यामुळंच बरीचशी पालक मंडळी अशा व्यक्तींकडून जबरदस्तीनं भीक मागून घेतात. कधीकधी त्या व्यक्तींचे मायबाप जिवंत असतात. तेव्हापर्यंत बरं असतं. त्यानंतर अशा विकलांग व्यक्तींचे हालहाल करुन टाकतात काही नातेवाईक.

विकलांग व्यक्तीचा जन्म घेताना कोणताही गुन्हा नसतो ना त्यांचं कोणतं पाप असतं. जर असे लोकं जन्मापासूनच विकलांग असले तर त्यांचा जन्म हा जनुकीय बदलातून झालेला असतो. परंतु जन्माच्या वेळी जे धडधाकट असतात. परंतु जे जन्मानंतर विकलांग होतात, त्यांचं विकलांग होणं हे त्यांच्यावर त्यानंतर आलेल्या संकटाचा परिपाक असतो. ते संकट जेवढं तीव्र, तेवढी विकलांगता तीव्र.

अलीकडे विकलांगता हा एक अभिशापच ठरलेला आहे. कारण या प्रकारात ग्रासीत असलेल्या लोकांना समाज खूप छळत आहे. त्यांचं जगणं समाजानं असह्य करुन टाकलेलं आहे. त्यांना केवळ नावबोटंच ठेवत नाहीत लोकं तर त्यांना भीक मागायला मजबूर करीत असतात. तसंच अतिशय मेहनतीची कामंही करुन घेत असतात. याही पुढे जावून काही काही मंडळी अशा विकलांग लोकांना दूर असलेल्या मंदिर परीसरात नेतात व त्यांना काही बहाणे सांगून तेथून पळ काढत असतात. त्यानंतर यात काही काही लोकं घरी परत न येता तिथंच स्थिराव–तात. कसंतरी जगावं म्हणून फुटपाथवर भीक मागून जगतात. काही मात्र सज्ञान असल्यानं परत येतात. परंतु जे विकलांगतेच्या प्रकारानुसार मतीमंद असतात ते मात्र आपल्या घरी परतच येवू शकत नाहीत. कारण त्यांना तेवढी बुद्धी नसते. ते तिथंच असलेल्या मंदिराच्या पायरीवर बसून राहतात. त्यातच भूक ही माणसाची मोठी गरज असल्यानं त्याच मंदिराच्या पायरीवर बसून भीक मागतात. त्यांना आपल्या प्रारब्धावर रडणंही जमत नाही.

अलीकडील काळात विकलांगता शाप जरी असला, तरी काही काही लोकांना तो शाप वाटत नाही. आजचा काळ पाहता मंदिर परिसरात एक अशीही टोळी सक्रीय झाली आहे की, मानवतस्करी करीत आहे. यात महिलांचीच तस्करी होत आहे. हे एका प्रसिद्ध दैनिकानं म्हटलं. परंतु त्यावरुनच सांगायचं झाल्यास या मानवतस्करीत विकलांग लोकांचाही समावेश नसेल कशावरुन? त्यांचीही तस्करी होत असेलच ही शक्यता नाकारता येत नाही. जी मंडळी या मंदिर परिसरात फिरत असतात. त्यांचा कोणी वाली नसल्यानं त्यांची मानवी तस्करी होतच असावी. परंतु त्यांचा कोणीच वाली नसल्यानं त्यांचं काही वर्तमानपत्रात नामोल्लेख दिसत नाही वा कोणी त्याबद्दल बोलत नाहीत.

महत्वाचं सांगायचं म्हणजे व्यक्ती विकलांग असणं हा गुन्हा आहे काय? तो व्यक्ती विकलांग आहे म्हणून त्याला कुठंही सोडून देणं वा सोडून जाणं हे बरोबर आहे काय? त्या विकलांग व्यक्तीला अर्थपूर्ण जीवन जगण्याचा अधिकार नाही काय? तसाच त्याचा जन्म काही मागील जन्माच्या शापाचा परिणाम आहे काय? या सर्वांची उत्तरं नाही अशीच आहेत. परंतु ते कोण समजून घेणार. कारण आज लोकांकडे वेळच उरलेला नाही कुणाच्या भावभावना समजून घ्यायला. जिथं आपल्याला जन्म देणाऱ्या मायबापाचीच आपण सेवा करु शकत नाही तिथं हे विकलांग. मग त्यांची सेवा आपण का करणार? आपण फक्त एवढंच करु शकतो की, ते दिसले तर त्यांना एकदोन रुपये देवून मोकळे होणे.

महत्वाचं म्हणजे ते विकलांग आहेत हा काही त्यांचा गुन्हा नाही. ते विकलांग आहेत हा त्यांच्या मागील जन्मातील पापपुण्याचा लेखाजोखा नाही आणि ते विकलांग आहेत, म्हणून आपल्यालाही त्यांचा फायदा घेण्याचा अधिकार नाही. आपण एक मानव म्हणून त्यांच्या भावना समजून घ्याव्यात. जगू द्यावं स्वाभिमानानं. हवं तर सरकारनं त्यांच्यासाठी शेल्टर होम काढावेत नव्हे तर त्यांची कोणी छेड काढणार नाही याकडे विशेष लक्ष असावं, सरकारचं आणि आपलंही. त्यातच कोणी त्यांची मानवतस्करी करणार नाही याकडेही सरकारनं, आपण व प्रशास–नानं बारकाईनं ध्यान देण्याची गरज आहे. त्यांनाही स्वाभीमानानं जीवन जगता येईल व स्वातंत्र्याचा पुरेपूर उपभोग घेता येईल यात शंका नाही. जेणेकरुन त्यांनाही वाटावं की, भारत माझा देश आहे व सारे भारतीय माझे बांधव आहेत.

**–अंकुश शिंगाडे**
नागपूर
मो. ९३७३३५९४५०

# युद्धाची धग सर्वसामान्यांच्या स्वयंपाकगृहात



अमेरिका आणि इजराईल या देशांनी इराणवर केलेल्या हल्ल्याला बारा दिवस उलटले तरी हे युद्ध थांबायचे नाव घेत नाही. हे युद्ध जरी आखातात सुरू असले तरी त्याची झळ जगाला बसणार असे मी माझ्या 'आखातातील युद्धाची जगाला झळ' या लेखात लिहिले होते. या युद्धाची झळ जगाला जशी बसतेय तशीच भारतालाही बसत आहे आणि युद्धाच्या या धगीत देशातील सर्वसामान्य नागरिकांची ससेहोलपट होत आहे. या युद्धाची धग आता भारतीयांच्या स्वयंपाक घरांमध्येही बसू लागली आहे.

इराण अमेरिका युद्धामुळे देशात गॅस तुटवडा निर्माण झाला असल्याने गॅस वितरक कंपन्यांच्या कार्यालयांपुढे नागरिकांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. स्वयंपाकाचा गॅस ही जीवनावश्यक गरज आहे. जर हे युद्ध आणखी काही दिवस चालले तर स्वयंपाकाला गॅस मिळणार नाही अशी भीती सर्वसामान्य नागरिकां–मध्ये पसरली झाली असल्याने जो तो गॅस मिळवण्याचा प्रयत्न करत आहे त्यासाठी तासंतास रांगेत उभे राहून गॅस पदरात पाडून घेण्याचा प्रयत्न करताना दिसत आहे.

सरकार सर्वसामान्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न करीत असले तरी टीव्हीवरील बातम्या पाहून सर्वसामान्यांच्या चिंतेत भरच पडत आहे. त्यात सरकारने गॅसच्या दरात ६० रुपये इतकी घसघशीत दरवाढ केल्याने भविष्यात गॅसचे दर आणखी वाढेल अशीही भीती निर्माण झाली आहे. सरकारने घरगुती गॅसला प्राधान्य देण्यासाठी व्यावसायिक सिलेंडरचे बुकिंग थांबवले आणि एकंदर बुकिंगची मुदत २५ ते ३० दिवसांवर नेण्यात आली. त्यामुळे नागरिकांच्या घबराटीत भरच पडली आणि सगळीकडून एकाच वेळी नोंदणीचे सत्र सुरू झाले. एकाच वेळी सगळीकडून नोंदणी होऊ लागल्याने नोंदणीत अडचणी येऊ लागल्या त्यामुळे नागरिक आणखी हवालदिल झाले.

सर्वसामान्य नागरिक घरगुती गॅस मिळत नसल्याने हवालदिल झाले आ–हेत तर व्यावसायिक सिलेंडरचा पुरवठा सरकारने बंद केला असल्याने हॉटेल व्यावसायिकांवर हॉटेलला टाळे लावण्याची वेळ आली आहे. हॉटेल बंद झाल्यास त्यावर उपजीविका करणाऱ्या हजारो कर्मचाऱ्यांच्या रोजी रोटीचा प्रश्न निर्माण झाला आहे. घरगुती गॅस प्रमाणेच सिनजी गॅसचाही तुटवडा जाणवू लागल्याने सीएनजी पंपावर रिक्षा आणि वाहनांच्या देशखील रांगा पहायला मिळत आहे.

गॅस तुटवड्यामुळे काही कंपन्यांनी आपले कामकाज बंद केले आहे एकूणच या युद्धाने देशातील नागरिक हैराण झाले आहेत. अर्थात हे होणारच होते याची पूर्व कल्पना सर्वांनाच होती. अमेरिका आणि अमेरिकेचे मित्र राष्ट्र असलेल्या देशांचे नाक दाबण्यासाठी इराणने हॉर्मुझची सामुद्रधुनी बंद केली त्यामुळे त्यामार्गे भारतात येणारे इंधन पुरवठा थांबला. देशाच्या गरजेपैकी ६० टक्के एलपीजी गॅस आपण आयात करतो आणि त्यातील ८० टक्के एलपीजी हा आखाती देशातून हॉर्मुझमार्गे भारतात येतो. तो मार्ग बंद झाल्याने देशातील ३० टक्के गॅस पुरवठा बाधित झाला आहे. हे होणार होते याची कल्पना सरकारलाही होती मात्र सरकारने राखीव साठा किंवा पुरेशी पर्यायी व्यवस्था न केल्याचेच हे परिणाम आहेत. हे युद्ध कधी थांबेल हे कोणीही ठामपणे सांगू शकत नाही. हे युद्ध आणखी काही दिवस चालले तर यापेक्षा भीषण परिस्थिती निर्माण होऊ शकते म्हणून सरकारने पर्यायी व्यवस्था आणि सुरळीत पुरवठा अशा दोन्ही आघाड्यांवर युद्धपातळीवर पावले उचलण्याची गरज आहे.

**–श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे

# ‘आस’ शिक्षक संघटनेकडून जिल्हा परिषदेसमोर धरणे आंदोलन

**नांदेड (प्रतिनिधी)–** शिक्षकांच्या विविध महत्वपूर्ण प्रलंबित प्रश्नांची सोडवणूक व्हावी म्हणून ‘आस’ शिक्षक संघटनेच्यावतीने जिल्हा परिषद नांदेड कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले.




‘आधार’ बाबत विद्यार्थ्यांची तांत्रिक अडचण लक्षात घेऊन २०२४-२५ ची संचमान्यता केली. त्याप्रमाणेच २०२५-२६ ची संचमान्यता व्हावी, ज्या शाळेत शिक्षकाचे पदच रिक्त नाही अशा शाळेत जिल्हांतर्गत बदलीने शिक्षकाची पदस्थापना झालेली आहे अशा शिक्षकांना जि. प. येथे परत बोलावून, त्यांची नियुक्ती इतर शाळेतील रिक्तपदी करावी, टीईटी व पदोन्नती बाबत योग्य ती कार्यवाही व्हावी, जिल्ह्यातील पात्र शिक्षकांना -नाशिक जिल्ह्याप्रमाणे, पुरवणी यादीद्वारे- निवडश्रेणी प्रदान करण्यात यावी, इ.स.२००५ पूर्वी जाहिरात व तद्नंतर नियुक्त झालेल्या शिक्षकांचा प्रश्न सोडवावे. DCPS/NPS शिक्षकांची रक्कम, संबंधित शिक्षकांच्या योग्य खात्यात जमा करण्यात यावी, ग्रामपंचायत अंतर्गत कार्यरत असलेल्या स्वच्छता कामगारामार्फत, शाळेतील स्वच्छतागृहांची साफ-सफाई नियमितपणे करण्यात यावी, केंद्रीय शाळा स्तरावर पदस्थापित करण्यात आलेल्या विशेष शिक्षकांचे विविध प्रश्न सोडविण्यात यावेत, संवर्गनिहाय शिक्षकांची सक्षम प्राधिकरणामार्फत योग्य ती तपासणी पूर्ण झाल्यानंतरच शिक्षकांना बदली अर्ज भरण्याची संधी देण्यात यावी, B.L.O. व अशैक्षणिक कार्य शिक्षकांना देण्यात येवू नये आदी मागण्या करण्यात आल्या.

या आंदोलनवेळी ‘आस’ शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष युवराज पोवाडे, राज्य प्रवक्ता -प्रल्हाद पवार, परमेश्वर वडजकर, गवलवाड विभागीय अध्यक्ष- अनिल कटके, विभागीय सचिव-सुधाकर गायकवाड, जिल्हा नांदेड कार्यकारिणीतील जिल्हा संपर्क प्रमुख -उमेश अंबुलगेकर, जिल्हाध्यक्ष -नईमोद्दीन सय्यद, जिल्हा कार्याध्यक्ष- सत्यजित चौहान, जिल्हा सचिव सुदर्शन उपलंचवार, उपाध्यक्ष संजय जानते, खाजगी अनुदानित जिल्हाध्यक्ष निळकंठ मठपती, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर उबाळे, विनाअनुदानितचे जिल्हाध्यक्ष- नागोराव जोंधळे, जिल्हा संघटक गोपीनाथ राजूरकर, कैलास धुतराज, हनमंत लोहबंदे, गणेश रब्बेवार, मुसळे परमेश्वर, केंद्रे यू. एन., सावरगावे एन. डी., शरद डावखरे, ओमप्रकाश वाडीकर, राम मुसंडे, संभाजी डुबुकवाड, देविदास कदम, बालाजी फुलपगार आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## सिडको ब्लॉक काँग्रेस कार्यकारिणी जाहीर

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ व खा. रवींद्र चव्हाण यांच्या सुचनेनुसार व महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार यांच्या मान्यतेनुसार सिडको वाघाळा ब्लॉक काँग्रेस कमिटी अध्यक्ष बापूसाहेब पाटील यांनी सिडको वाघाळा ब्लॉक काँग्रेस कमिटीची कार्यकारिणी जाहीर केली आहे. यात दहा वरिष्ठ सल्लागार, चार कार्याध्यक्ष, सहा उपाध्यक्ष, सहा सरचिटणीस, एक कोषाध्यक्ष, चार सचिव व दोन संघटक सचिव आदींसह तेहतीस जणांचा समावेश करण्यात आला आहे.

वरिष्ठ सल्लागार म्हणून प्रल्हादराव गव्हाणे, डॉ.अशोक कलंत्री, जे. पी. पाटील, अशफाक भाई, माणिक श्रोते, सोपानराव पांडे, मुस्तफाखान पठाण, नरोद्दीन सहाब, एस.पी. कुंभारे, आनंदा गायकवाड आदीचा समावेश करण्यात आला आहे. कार्याध्यक्षपदी संजय कदम, किशन रावनगावकर, लतिफ शेख, डॉ. गणेश लिंगमपल्ले उपाध्यक्षपदी देवीदास कदम, शेख मोईन लाठकर, सुदाम इंगेवाड, गोपीनाथ कहाळेकर, अजय गालेवाड, मोहम्मद नईमोद्दीन नरोद्दीन सरचिटणीसपदी उत्तमराव कदम, शेख शादुल, भगवान जोगदंड, तौफिक खान, कामेश भूरे, शेख अझर शेख लतिफ कोषाध्यक्षपदी गजानन शिंदे सचिनपदी केरबा माने, सुभाष हनगुंडे, सोपान भूरे, मोहम्मद खलिल शेख अहेमद, तर संघटक सचिवपदी प्रभू उरुदवाड, शेख युसूफ आदींची नियुक्ती करण्यात आली आहे.

## वेस्टन्स क्रिकेट असोसिएशनचे टी-२० क्रिकेट सामने २० संघांची निवड; सामने सुरू

**नांदेड (प्रतिनिधी)** -वेस्टन्स क्रिकेट असोसिएशन्स फॉर महाराष्ट्रा यांच्या वतीने नांदेड येथील श्री गुरू गोविंदसिंघजी स्टेडियम येथे दि. १२ ते १५ मार्च दरम्यान वेस्ट झोन क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले असून, याकरिता २० संघांची निवड जाहीर करण्यात आली आहे. गुरुवार, दि. १२ मार्चपासून या क्रिकेट टी-२० सामन्याला प्रारंभ होणार आहे, अशी माहिती वेस्टन्स क्रिकेट असोसिएशन्स फॉर महाराष्ट्राचे टीम मॅनेजर तथा कोच महंमद फहीम यांनी दिली.

आजपासून या क्रिकेट सामन्याला प्रारंभ होणार असून, महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतून ३० संघ निवडण्यात आले होते. त्यातून अंतिम २० संघांची निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र, विदर्भ, गोवा आणि मुंबई अशा संघांचा समावेश असेल. प्रत्येक संघामध्ये नावाजलेले माजी रणजी खेळाडू सहभाग घेणार आहेत. या संघांची घोषणा अनिल देशमुख, श्रीकांत जाधव, अभय गजेंद्रगडकर व महंमद फहीम यांनी केली. संघाच्या कर्णधारपदी अभिजीत कदम व उपकर्णधारपदी खालीद जमान यांची निवड करण्यात आलेली आहे.

इतर संघाचे कर्णधार पुढीलप्रमाणे- सांगली अभिजीत कदम, बीड किशोर जगताप, पुणे मोहन बडुरे, पुणे प्रदीप नयनित, जालना निरंजन चव्हाण, बीड गोपाल गुरूकुते, बीड अजय जाधव, मालेगाव खालीद जमान, नांदेड शेख सरदार, नांदेड सय्यद आफरोज, नांदेड शेख मतीन, सांगली अमसिद्ध गुंडघड, सातारा रमेश भोसले, सातारा अभिजीत पोतेकर, परभणी शेख जावेद, परभणी एजाज कादरी, परभणी विठ्ठल खल्लाळ, कोल्हापूर नितीन सावर्डीकर, छत्रपती संभाजीनगर शेख साजीद, छत्रपती संभाजीनगर आफीन खान, कोल्हापूर सचिन गाडगीळ या संघांची निवड करण्यात आली आहे.

दि. १२ ते १५ मार्च दरम्यान हे टी-२० क्रिकेट सामने पार पडणार असून, गुरुवार, दि. १२ मार्च रोजी पहिला सामना महाराष्ट्र विरूद्ध विदर्भ सकाळी ९.३० ते १ या दरम्यान तर दुसरा सामना मुंबई विरुद्ध गोवा दुपारी १.३० ते ५.३० या दरम्यान होणार आहे. वेस्ट झोन टी-२० क्रिकेट सामन्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन वेस्टन्स क्रिकेट असोसिएशन्स फॉर महाराष्ट्राचे टीम मॅनेजर तथा कोच महंमद फहीम यांनी केले आहे.



**मुंबई** -भारतातील अर्जेंटिनाचे राजदूत मारिआनो ऑगस्टीन कौशिआनो यांनी नुकतीच नवी दिल्ली येथे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा खासदार अशोकराव चव्हाण यांची सदिच्छा भेट घेतली.

## नांदेड विभागात तिकीट तपासणी मोहिमेदरम्यान बस रेड व रोड चेक्स

### एका दिवसात ६४४ अनधिकृत प्रवाशांकडून २.९१ लाखांची वसुली

**नांदेड (प्रतिनिधी)** – दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाने विनातिकीट प्रवासाला आळा घालण्यासाठी व रेल्वे प्रवास अधिक शिस्तबद्ध करण्याच्या उद्देशाने ९ मार्च रोजी सकाळी चार ते सायंकाळी आठ या कालावधीत विशेष तिकीट तपासणी मोहीम राबवली. या मोहिमेत बस रेड व रोड चेक्स देखील करण्यात आले.

ही मोहीम सहाय्यक वाणिज्य व्यवस्थापक शैलेशकुमार सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या कारवाईत ३४ तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला व विभागातील विविध मार्गांवरील एकूण २३ गाड्यांची तपासणी करण्यात आली. विशेषतः बस रेड व रोड चेक्सवर भर देत सर्व पथकांनी विनातिकीट किंवा अनियमित प्रवास करणाऱ्या प्रवाशांचा शोध घेण्यासाठी सक्रिय सहभाग घेतला.



या मोहिमेदरम्यान ५२७ विनातिकीट प्रवास प्रकरणे आढळून आली असून, त्यातून भाडे म्हणून १,२९,५४५ आणि दंड म्हणून १,३२,१५० अशी वसुली करण्यात आली. तसेच ३७ अनियमित प्रवास प्रकरणे आढळून आली असून, त्यातून भाडे म्हणून ७,७८० व दंड म्हणून ९,२५० अशी वसुली झाली. याशिवाय ८० अनबुक्ड लगेज प्रकरणे नोंदवून १२,७१० इतकी वसुली करण्यात आली.

एकूण ६४४ प्रकरणे नोंदविण्यात आली असून, या कारवाईतून एकूण २,९१,४३५ इतकी वसुली करण्यात आली. रेल्वे नियमांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी तसेच प्रामाणिक प्रवाशांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी अशा प्रकारच्या विशेष मोहिमा नियमितपणे राबविण्यात येतात.

रेल्वे प्रशासन सर्व प्रवाशांना विनंती करते की, प्रवाशांनी केवळ वैध तिकीट किंवा अधिकृत प्रवास परवानगीसहच प्रवास करावा. तसेच अनबुक्ड सामान घेऊन प्रवास टाळावा. प्रवाशांनी तिकीट बुकिंगसाठी अधिकृत प्लॅटफॉर्म जसे की RailOne app यांचा वापर करावा. नांदेड विभाग सुरक्षित, शिस्तबद्ध व प्रवासी-अनुकूल प्रवास वातावरण राखण्यासाठी कटिबद्ध आहे.

## कारेगाव येथे आज माजी विद्यार्थी मेळावा

**नांदेड (प्रतिनिधी)** -लोहा तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कारेगाव येथे गुरुवार, दि. १३ मार्च रोजी सकाळी ९ वाजता शाळेच्या मैदानात मेळावा ठेवलेला आहे.

यावेळी कारेगाव गावातील सर्व सरपंच, उपसरपंच, सर्व सदस्य, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व सदस्य, चेअरमन व माजी चेअरमन, तंटामुक्ती अध्यक्ष, सोसायटीचे सर्व सदस्य, नागरिक, विद्यार्थ्यांचे पालक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कारेगावचे सर्व शाळेचे माजी विद्यार्थी, विविध क्षेत्रातील काम करणारे अधिकारी, पदाधिकारी, व्यावसायिक, शेतकरी, आजी-माजी सैनिक, शिक्षक उपस्थित होते.

यावेळी शाळेतील अडीअडचणी व समस्या जाणून घेणे, इयत्ता पहिलीला विद्यार्थी प्रवेश देणे, शाळा डिजिटल करणे, डिजिटल बोर्ड खरेदी करणे, शाळा खोलेल्यांची दुरुस्ती, झाडे लावणे, शाळा रंग रंगोटी करणे, शाळेला संरक्षण भिंत बांधणे, पिण्याच्या पाण्याची सोय करणे, विद्यार्थी गुणवत्ता वाढवणे, शैक्षणिक उपक्रम घेणे, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, तयारी करणे बाबत मार्गदर्शन, आपल्या सुचना समजून घेण्यात येणार आहेत. तेव्हा नागरिकांनी वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## शिक्षणाधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांना शिक्षक कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी मराठवाडा शिक्षक संघाचे निवेदन

**नांदेड (प्रतिनिधी)** -सरकारी, निमसरकारी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे विविध प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी मुख्यमंत्री यांना शिक्षणाधिकारी यांच्यामार्फत विविध प्रलंबित प्रश्न सोडविण्याचे निवेदन मराठवाडा शिक्षक संघाच्या वतीने देण्यात आले.




सर्वांना जुनी पेन्शन योजना लागू करा, दि. १ नोव्हेंबर २००५ पूर्वी विनाअनुदान, अंशतः अनुदानावर नियुक्त तसेच २००५ नंतर १००% अनुदानावर आलेल्या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना तसेच वस्तीशाळा शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करा, चतुर्थ श्रेणी कर्मचारी व वाहन चालक भरतीवरील बंदी तात्काळ उठवा, १०:२०:३० वर्षाच्या सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना लागू करा, सर्व सरकारी कर्मचारी/ निवृत्ती वेतनधारक/ कंत्राटी रोजंदारी कर्मचारी यांना सर्व महत्त्वाच्या इस्पितळात कॅशलेस उपचार मिळावे त्यासाठी व्यापक स्वास्थ विमा योजना लागू करावी, सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करा, प्रतीक्षा यादीतील सर्व पात्र उमेदवारांना अनुकंपा तत्त्वावरील नियुक्ती द्या, सर्व संवर्गातील रिक्त पदे भरण्यासंदर्भातील कार्यवाहीचा वेग वाढवावा, चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना नियुक्ती देण्यासंदर्भातील १९८१ च्या शासन निर्णयाची पूर्ण स्थापना करा, शिक्षकांचे जीवन उद्ध्वस्त करणारा १५ मार्च २०२४ चा संच मान्यतेचा शासन आदेश बाबत पुन्हा विचार करण्यात यावा आदी या निवेदनात मागण्या करण्यात आल्या आहेत.

## जिल्ह्यात दोन ठिकाणी खुनाचा प्रयत्न; लोहा आणि कुंटूर ठाण्यात गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** लोहा तालुक्यातील बोरगाव येथे तर बिलोली तालुक्यात दुगाव येथे जुन्या वादातून दोघांवर प्राणघातक हल्ला करणाऱ्या आरोपींविरुद्ध लोहा आणि कुंटूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लोहा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बोरगाव येथे ७ मार्च रोजी दुपारी तीनच्या सुमारास जुन्या वादाचे कारण पुढे करून नारायण व्यंकटराव पाटील (वय ६८) यांना पुंडलिक हरजी पाटील, अजित पुंडलिक पाटील, जयश्री पुंडलिक पाटील आणि उद्धव साहेबराव पाटील या चार जणांनी संगनमत करून शिवीगाळ करत लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. एवढेच नाही तर त्यांना ठार मारण्याच्या उद्देशाने लोखंडी रॉड डोक्यात मारून जबर दुखापत केली. नारायण पाटील यांच्या फिर्यादीवरून लोहा पोलीस ठाण्यात चार जणांविरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तर दुसऱ्या घटनेत बिलोली तालुक्यातील दुगाव येथे माधवराव विठ्ठलराव जाधव यांना १० मार्च रोजी सकाळी ११ वाजता बालाजी गोविंद जाधव, ज्ञानेश्वर संजय जाधव, शैलेश संजय जाधव, संजय विठ्ठल जाधव, साईनाथ गोविंद कदम या सर्वांनी मिळून ट्रॅक्टरने नांगरण्याच्या कारणावरून जबर मारहाण केली. यात माधव जाधव हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर नांदेडच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## बिलोली येथे आज पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र नांदेड व श्रीधर स्वामी शासकीय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बिलोली यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार १३ मार्च २०२६ रोजी श्रीधर स्वामी शासकीय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बिलोली येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय प्लेसमेंट ड्राईव्ह/ रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या प्लेसमेंट ड्राईव्ह /रोजगार मेळाव्यामध्ये विविध खाजगी आस्थापनामध्ये रोजगार व नोकरीच्या संधी साठी मुलाखती घेण्यात येणार असून जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांनी शुक्रवार १३ मार्च २०२६ सकाळी ११ वा. पासून श्रीधर स्वामी शासकीय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बिलोली येथे उपस्थित राहून या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र नांदेड यांनी केले आहे. अधिक माहिती व संपर्कासाठी मा. सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, आनंदनगर रोड, बाबानगर नांदेड ईमेल आयडी परपवशवीक्षसरी०१सारळश्र. ले दूरध्वनी क्रमांक ०२४६२-२५१६७४ व योगेश यडपलवार ९८६०७२५४४८ वर संपर्क साधावा, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता सहायक आयुक्त डॉ. रा. म. कोल्हे यांनी केले आहे.

## जीवन घोगरे पाटील यांना अटक करण्याच्या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला मोर्चा



**नांदेड (प्रतिनिधी)** – आकांक्षा गायकवाड मृत्यूप्रकरणी दोषी म्हणून जीवन घोगरे पाटील यांना तत्काळ अटक करावी, पीडितांना आर्थिक मदत करून न्याय द्यावा, या मागणीसाठी मंगळवार, दिनांक ११ मार्च रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला.

यावेळी मोर्चात शेकडो महिला व पुरुष यांची उपस्थिती होती. जीवन घोगरे पाटील आणि सहआरोपींना तत्काळ अटक करावी व पीडिताच्या कुटुंबाला आर्थिक मदत द्यावी, आदी मागण्या मोर्चेकऱ्यांनी केल्या.

यावेळी राष्ट्रीय संविधान बचाव अभियान राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. देविदास इंगळे, राज्य संघटक मारोती चिवळीकर, सामाजिक कार्यकर्ते गणपत रेड्डी, भाकपाचे माले, राज्य सेक्रेटरी दिगंबर घायाळे, शिवक्रांती बहुजन संघटनेचे वैशाली हिंगोले, मारोती घोरपडे, रावसाहेब डोईबळे, मुंजाजी मुळेकर यांच्यासह पीडित विद्यार्थिनीची आई आणि इतर महिला व पुरुषांची उपस्थिती होती.

## जन्मदात्या बाळाला घेऊन परीक्षा देणाऱ्या मातेचा सन्मान

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्यात सुरू असलेल्या बारावी बोर्डाच्या परीक्षेचा शेवट बुधवारी झाला. परीक्षेच्या शेवटच्या दिवशी आपल्या जन्मदात्या तान्हुल्या बाळाला सोबत घेऊन बारावी बोर्डाची परीक्षा देणाऱ्या मातेचा सन्मान बुधवारी पीपल्स महाविद्यालयात करण्यात आला.



विद्यार्थी जीवनातील महत्त्वाचा टप्पा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बारावी बोर्डाच्या परीक्षेला राज्यामध्ये दि. १० फेब्रुवारीपासून सुरुवात झाली होती. या परीक्षेचा शेवट बुधवारी झाला. नांदेड येथील पीपल्स महाविद्यालयात बारावी बोर्ड परीक्षा शांततेत व सुरळीत पार पडली. केंद्रावर एकूण ८६१ परीक्षार्थी होते. प्रशासनाच्या वतीने परीक्षा केंद्रांवर बैठे पथकांमार्फत झूम वेबकास्टद्वारे संपूर्ण वेळ परीक्षेचे नियंत्रण काटेकोरपणे ठेवण्यात आले होते. परीक्षेतील गैरप्रकार टाळण्यासाठी भरारी पथके, बैठे पथकाद्वारे नियंत्रण ठेवण्यात आले होते.

परीक्षेदरम्यान पीपल्स महाविद्यालयात अत्यंत हृदयस्पर्शी घटना घडली. शितल चंद्रकात चित्ते (२१) या मातेने आपल्या नवजात तान्हुल्या बाळाला घेऊन बारावी बोर्ड परीक्षा दिली. शीतल जेव्हा बाळाला घेऊन आली, तेव्हा कॉलेज प्रशासनानेही माणुसकी दाखवली. तिची शिक्षणाची धडपड पाहून ही मुलगी एवढ्या कष्टाने येतेय, तर आपण तिच्यासाठी काय करू शकतो, असा विचार करून महाविद्यालयात मातृ स्नेह कक्ष तयार करण्यात आला. या कक्षात बाळाला विश्रांतीसाठी पाळण्याची व्यवस्था करण्यात आली होती. आईची माया आणि तिला शिक्षणाची असणारी गोडी पाहून शितलचे सर्वत्र कौतुक झाले.

## जिल्ह्यात जमावबंदी, शस्त्रबंदी आदेश लागू

**नांदेड (प्रतिनिधी)** -नांदेड १३ मार्चच्या सकाळी ६ वाजेपासून ते २७ मार्च २०२६ च्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहणार आहे, अशी माहिती अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून अपर जिल्हादंडाधिकारी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये जिल्ह्यात १३ मार्चच्या सकाळी ६ वाजेपासून ते २७ मार्च २०२६ च्या मध्यरात्रीपर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहील. त्यानुसार पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी या आदेशात नमूद असलेली कृत्ये सार्वजनिक परिसर किंवा त्याच्या जवळपास करण्यास बंदी घालण्यात आली आहे.

## डॉ. आंबेडकर सार्वजनिक जयंती मंडळाच्या अध्यक्षपदी सुलोचना ढोले




**भोकर (प्रतिनिधी)–** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३६ वी सार्वजनिक जयंती उत्सव समिती भोकरच्या अध्यक्षपदी सुलोचना ढोले यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.

यावर्षी १४ एप्रिल रोजीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची मिरवणूक काढण्यात येणार आहे. उपाध्यक्षपदी डॉ. मनोज गिमेकर, दिलीप राव, गौतम कसबे, सचिवपदी एल. ए. हिरे यांची निवड करण्यात आली आहे.

दि. १० मार्च रोजी भोकर येथील शासकीय विश्रामगृहावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३६ वी जयंती साजरी करण्यासाठी सेवानिवृत्त मुख्याध्यापिका यशोदा महाबळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. या बैठकीत भोकरमध्ये १४ एप्रिल रोजी मिरवणूक काढण्याचा एकमुखी निर्णय घेण्यात आला. त्यानंतर विविध सांस्कृतिक कार्यक्रम घेण्याचे ठरले. सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी सुलोचना ढोले यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली.

# अंतर्मन



## तुम्हाला जी गोष्ट नकोय, ती व्यक्तच करू नका...

# अपयश टाळण्याचे महत्त्वाचे सूत्र...

**सर्व सुखसोयी आणि सुविधांनी युक्त आलिशान घरात बसलेला निराश, थकलेला माणूस स्वतःच्या विचारांनी लवकर पराभूत होऊ शकतो. अशा परिस्थितीत आशेचा किरण यशासाठी एक शक्तिशाली चुंबक आहे. आशा टिकवून ठेवण्यासाठी, एखाद्याने नेहमी महापुरुषांच्या शिकवणींचे पालन केले पाहिजे. महापुरुष म्हणतात, 'तुम्हाला जे नकोय, त्याचा विचारही करू नका...' जेव्हा आपण त्याबद्दल विचार करतो तेव्हाच यश आणि समृद्धी मिळते...**

चांगल्या आरोग्याचे सुख मिळविण्यासाठी प्रथम स्वतःमध्ये पहा की चिंता आणि भीती तिथे लपून बसली आहे का? तुमच्या मनाच्या कोणत्या कोपऱ्यात निराशा लपून बसली आहे, जी तुम्हाला वारंवार त्रास देत आहे का? कधीकधी एक सामान्य व्यक्ती, त्याच्या शब्दांद्वारे, कृतीद्वारे आणि व्यक्तिमत्त्वाद्वारे, इतरांवर इतका प्रभाव पाडते की ते नकळतपणे प्रेरणास्थान बनतात.

व्यक्तिमत्व म्हणजे केवळ शारीरिक रचना, रंग-रुप किंवा राहणीमान नसते; बोलणे, चालणे, उठणे आणि बसणे या सोबतच ते विचार आणि मनात लपलेल्या शक्तींशी संबंधित असते. जो माणूस सतत अपयशाबद्दल विचार करतो तो कधीही यश मिळवू शकत नाही, तो कितीही सक्षम असला तरीही. केवळ सकारात्मक विचारानेच यश मिळते. नकारात्मक घटना आणि नकारात्मक विचारांनी सतत व्यस्त राहणे स्वतःसाठी हानिकारक आहे. हे विचार मनातून काढून टाकण्याचा एकमेव मार्ग म्हणजे चिंता न करता चिंतन करणे.

बंद खोलीत एकटे बसून आपल्या दुर्दैवाला शाप देऊ नका. डळमळीत पावलांनी माणूस ध्येय गाठू शकत नाही. विचार आपल्याभोवती कोळ्याच्या जाळ्यासारखे फिरतात. बाहेरून मदतीची आवश्यकता असली तरीही तुम्ही कोणत्या क्षेत्रात यशस्वी होऊ शकता ते ओळखा. मदत घेण्यास कधीही मागेपुढे पाहू नका. यशासाठी, एखाद्या ज्ञानी व्यक्तीला तुमचा गुरु बनवा आणि त्यांच्या सूचनांचे पालन न करता त्यांचे पूर्णपणे पालन करा. असे केल्याने तुम्हाला महाभारतातील अर्जुनाप्रमाणे आदर आणि यश मिळेल. ज्याप्रमाणे दुर्योधनाने भगवान श्रीकृष्णाच्या शब्दांकडे दुर्लक्ष केले, त्याचप्रमाणे ज्ञानी पुरुष किंवा शिक्षकांच्या शब्दांकडे कधीही दुर्लक्ष करू नये.

# स्वप्नात पाल पाहणे शुभ की अशुभ?, स्वप्नशास्त्रात या स्वप्नांचा अर्थ काय?

**स्वप्नशास्त्रानुसार स्वप्ने भविष्याबद्दल माहिती देतात. काही स्वप्ने सकारात्मक संकेत देतात, तर काही तुम्हाला सावध करतात. तुम्ही स्वप्नात जे पाहता ते तुमच्या नियंत्रणाबाहेर आहे. पण स्वप्ने आपल्याला कोणते संकेत देतात आणि त्यांचा अर्थ काय आहे हे स्वप्नशास्त्रात सविस्तरपणे स्पष्ट केले आहे. या संदर्भात, स्वप्नात पाल पाहण्याचा अर्थ काय आहे ते पाहूया...**



- पाल पळत असणे : स्वप्नशास्त्रानुसार स्वप्नात पाल पळत असणे हे एक शुभ चिन्ह मानले जाते. असे मानले जाते की अशा स्वप्नांचा अर्थ असा आहे की जर तुम्हाला जीवनात ताण किंवा समस्या येत असतील तर तो ताण कमी होईल.
- पाल मारणे : जर एखाद्या व्यक्तीने तो पालीला मारत असल्याचे पाहिले तर ते शुभ चिन्ह आहे. या स्वप्नाचा अर्थ असा आहे की त्यांच्या अडचणी लवकरच संपतील. आतापर्यंत तुम्ही ज्या सर्व समस्यांना तोंड दिले आहे त्या आता दूर होणार आहेत.
- अनेक पाली दिसणे : स्वप्नात अनेक पाली दिसल्या तर हे चांगले स्वप्न नाही. याचा अर्थ असा की तुमच्या आयुष्यात एकाच वेळी अनेक समस्या उद्भवू शकतात. तुमच्या कारकिर्दीत तुम्हाला मानसिक दबावाचा सामना करावा लागू शकतो. मानसिक ताण वाढण्याची शक्यता देखील आहे.
- पालीचे पिल्लू दिसणे : तुम्हाला स्वप्नात पालीचे पिल्लू दिसले तर येणाऱ्या काळात तुम्हाला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागेल. तुम्ही जे काही कराल ते पूर्ण होण्यास वेळ लागू शकतो.
- शरीरावर पाल चढणे : स्वप्नात तुमच्या शरीरावर पाल पडताना किंवा चढताना दिसली तर याचा अर्थ येणाऱ्या काळात तुमच्या शत्रूंमुळे तुम्हाला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागू शकते. जर तुम्हाला तुमच्या डोक्यावर पाल चढताना दिसली तर याचा अर्थ असा की तुम्हाला आरोग्याच्या समस्यांना तोंड द्यावे लागू शकते. तथापि, जर तुम्हाला डाव्या खांद्यावर पाल चढताना दिसली तर याचा अर्थ असा की तुमच्यात नवीन शत्रू निर्माण होऊ शकतात. जर पाल तुमच्या उजव्या खांद्यावर चढली तर याचा अर्थ तुम्हाला ताण येऊ शकतो.

# हारे का सहारा खाटू श्याम हमारा...

**राजस्थानमधील सीकर जिल्ह्यातील खाटू श्याम धाम हे केवळ मंदिर नाही, तर श्रद्धा, त्याग आणि भक्तीचे प्रतीक आहे. बर्बरीकच्या शीशदानाच्या कथेमुळे या मंदिराला अनन्य धार्मिक महत्त्व मिळाले आहे. दरवर्षी लाखो भक्त येथे येऊन श्याम बाबांच्या चरणी नतमस्तक होतात. खाटू श्याम बाबा यांना हारे का सहारा असेही म्हटले जाते. म्हणजे संकटात सापडलेल्या भक्ताला आधार देणारे देव. त्यामुळे भारतातील अनेक भक्तांची ही अत्यंत श्रद्धेची जागा बनली आहे.**



## काय आहे बर्बरीकच्या शीशदानाची कहानी...

### खाटू श्याम मंदिराचा इतिहास

खाटू श्याम यांची कथा महाभारत या महाकाव्याशी जोडलेली आहे. खाटू श्याम यांचे मूळ नाव बर्बरीक होते. ते भीम यांचे नातू आणि घटोत्कच यांचे पूत्र होत. बर्बरीक अतिशय शक्तिशाली योद्धा होता. त्याच्याकडे तीन दिव्य बाण होते. त्याने प्रतिज्ञा केली होती की तो नेहमी युद्धातील कमकुवत बाजूला मदत करेल. हे पाहून श्रीकृष्णाने ब्राह्मणाचा वेष धारण करून त्याची परीक्षा घेतली. बर्बरीकची प्रतिज्ञा युद्धाचा समतोल बिघडवेल असे लक्षात आल्यावर कृष्णाने त्याच्याकडे शीश दान मागितले. बर्बरीकने आनंदाने आपले मस्तक अर्पण केले. त्याच्या या त्यागाने प्रसन्न होऊन कृष्णाने वर दिला की कलियुगात त्याची पूजा श्याम या नावाने होईल.

### मंदिराची स्थापना

लोककथेनुसार पुढे बर्बरीकचे मस्तक राजस्थानमधील खाटू गावात जमिनीत सापडले. एका गायीच्या थनातून त्या जागी आपोआप दूध वाहू लागले. गावकऱ्यांनी ती जागा खोदली. तेथे बर्बरीकचे मस्तक सापडले. स्थानिक राजा रूपसिंह चौहान यांना स्वप्नात आदेश मिळाल्यानंतर त्यांनी सुमारे इ.स. १०२७ मध्ये मंदिर बांधले आणि ते मस्तक तेथे प्रतिष्ठापित केले. आजचे मंदिर मकराना संगमरवराने बांधलेले असून त्याची वास्तुकला अत्यंत सुंदर आहे.

### खाटू श्याम येथे काय पाहावे?

- खाटू श्याम मंदिर : हे मुख्य मंदिर आहे. श्याम बाबांची मूर्ती आणि दर्शनासाठी सभामंडप आहे.
- श्याम कुंड : जिथे बर्बरीकचे मस्तक सापडले असे मानले जाते तो पवित्र कुंड.
- श्याम बागीचा : येथे भक्त भजन, कीर्तन आणि धार्मिक कार्यक्रम करतात.
- गौरी शंकर मंदिर : खाटू गावातील आणखी एक प्रसिद्ध मंदिर.
- निशाण यात्रा : भक्त निशाण (ध्वज) घेऊन पदयात्रा करून मंदिरात येतात.



### दर्शनासाठी योग्य काळ

- फाल्गुन मेला (फेब्रुवारी-मार्च) : सर्वात मोठा उत्सव
- एकादशी आणि रविवार : मोठी गर्दी
- हिवाळा : प्रवासासाठी उत्तम

### कसे जावे?

खाटू गाव राजस्थानातील सीकर जिल्ह्यात आहे. सर्वात जवळचे प्रमुख शहर जयपूर सुमारे ८० किमी आहे. सिकरहून ते सुमारे ४५ किमी आहे. जवळचे रेल्वे स्टेशन रिंगस असून, तिथून खाटू श्याम अंतर १७ किमी आहे.

### महाराष्ट्रातून खाटू श्याम कसे जावे?

- मुंबईहून : मुंबईहून जयपूर, थेट विमानसेवा आहे. रेल्वेने मुंबई जयपूर, सीकर, रिंगस असा मार्ग आहे. नंतर बस किंवा टॅक्सीने खाटू श्याम मंदिरात जाता येते.
- पुण्याहून : पुण्यावरून जयपूरला थेट विमान सेवा आहे. रेल्वेने आधी जयपूर, पुढे बस किंवा टॅक्सीने खाटूला जाता येते.
- कोल्हापूरहून : कोल्हापूरहून आधी मुंबई किंवा पुणे जायचे. तिथून पुढे रेल्वे किंवा विमानाने जयपूरला जाता येते. जयपूरहून खाटूला जाण्यासाठी बस, टॅक्सी भरपूर आहेत.
- छत्रपती संभाजीनगरहून : रेल्वेने आधी जयपूर किंवा दिल्ली, तिथून रिंगस रेल्वे स्टेशनला, रिंगसहून खाटूला बस किंवा शेअर जीप भरपूर आहेत.
- नांदेडहून : नांदेडहून रेल्वेने जयपूर किंवा दिल्ली, तिथून रिंगस स्टेशन. रिंगसहून खाटूला बस, टॅक्सी भरपूर आहेत.

### यात्रेकरूंसाठी उपयुक्त माहिती

मंदिराजवळ अनेक धर्मशाळा व हॉटेल्स आहेत. फाल्गुन मेळ्यात लाखो भक्त येतात. हा मेळा नुकताच होऊन गेला आहे. या मेळ्यादरम्यान जाताना आगाऊ बुकिंग करणे योग्य आहे.



# कपाळ, तळहातासह शरीराच्या या भागांवर तीळ असणे अत्यंत शुभ!; जीवनातील धनसंपत्ती, सुखप्राप्तीचे संकेत

**प्रत्येक व्यक्तीच्या शरीरावर तीळ असतात. काही जन्माच्या वेळी दिसतात, तर काही नंतर दिसतात. या लहान आणि मोठ्या तीळांबद्दल सामुद्रिक शास्त्रात बरेच काही सांगितले आहे. असे मानले जाते की शरीरावरील तीळ आपल्याला भविष्याबद्दल आणि नशिबाबद्दल संकेत देतात. शास्त्रांमध्ये तीळ नशिबाचे सूचक मानले जातात. शरीराच्या काही भागांवर, कपाळावर आणि तळहातावर तीळ असणे हे संपत्ती आणि आनंद दर्शवते. शरीराच्या कोणत्या भागांवर तीळ असणे शुभ मानले जाते ते पाहूया...**

- कपाळावर तीळ : सामुद्रिक शास्त्रानुसार, कपाळावर तीळ हे एक अत्यंत शुभ चिन्ह आहे. हे सूचित करते की असे लोक यशाचा मार्ग स्वतः शोधतात आणि परिश्रमपूर्वक काम करतात. ते त्यांच्या प्रयत्नांनी आणि कठोर परिश्रमाने जीवनात उच्च पदे प्राप्त करतात. परिणामी, त्यांना कधीही पैशाची कमतरता भासत नाही. कपाळावर तीळ हे संपत्तीचे लक्षण मानले जाते.
- कपाळाच्या उजव्या बाजूला तीळ : जर एखाद्या व्यक्तीच्या कपाळाच्या उजव्या बाजूला तीळ असेल तर ते देखील एक शुभ चिन्ह मानले जाते. अशा लोकांना त्यांच्या जीवनात खूप आदर आणि प्रतिष्ठा मिळते. कपाळाच्या डाव्या बाजूला तीळ हे देखील सूचित करते की असे लोक भरपूर पैसे कमवतील. शिवाय, मध्यभागी तीळ हा सौभाग्याचे लक्षण मानला जातो.
- उजव्या तळहातावर तीळ : असे मानले जाते की एखाद्या व्यक्तीच्या तळहातावर तीळ हा संपत्तीचे लक्षण आहे. अशा व्यक्ती भाग्यवान मानल्या जातात. त्यांना नशीब लाभलेले असते आणि ते खूप मेहनती असतात. त्यांच्या कठोर परिश्रमाने ते यश मिळवतात आणि मोठी उंची गाठतात.
- उजव्या गालावर तीळ : सामुद्रिक शास्त्रानुसार, उजव्या गालावर तीळ असणे शुभ मानले जाते. कारण ते संपत्ती वाढण्याचे लक्षण मानले जाते. अशा व्यक्ती श्रीमंत असतात आणि जीवनाचा आनंद घेतात. त्यांना नशीबही लाभते. तथापि, जर तीळ गालाच्या डाव्या बाजूला असेल तर ते स्वभावाने थोडेसे खर्चिक असू शकतात.
- मानेवर तीळ : व्यक्तीच्या मानेवर तीळ असणे शुभ मानले जाते. अशा व्यक्ती जीवनात आनंद आणि समृद्धी अनुभवतात आणि ते सौभाग्याचे देखील लक्षण मानले जाते. असे मानले जाते की मानेवर तीळ असणे हे सूचित करते की अशा व्यक्तींना सर्व प्रकारच्या सुखसोयी आणि विलासिता मिळतील. ते त्यांच्या कठोर परिश्रमाने त्यांच्या कारकिर्दीत प्रगती करतात.






# घरात गायीची मूर्ती कोणत्या दिशेने ठेवावी? अशा प्रकारे मूर्ती ठेवल्याने जीवनात आनंद आणि समृद्धी येईल...



**हिंदू धर्मात गाय पवित्र मानली जाते. वास्तुशास्त्रानुसार, घरात गायीची मूर्ती ठेवल्याने आजूबाजूच्या वातावरणावर सकारात्मक परिणाम होतो. असे मानले जाते की गाय शुक्र ग्रहाचे प्रतीक आहे आणि वासरू प्रेम आणि मातृत्वाचे प्रतीक मानले जाते. घरात गायीची मूर्ती ठेवल्याने आनंद, शांती आणि समृद्धी टिकून राहते. त्यामुळे कुटुंबातील सदस्यांमध्ये परस्पर प्रेम वाढते. विवाहित जोडप्यांनी घरात पितळी गायीची मूर्ती ठेवावी आणि ती मुलांसाठीही शुभ मानली जाते. तथापि, घरात गायीची मूर्ती ठेवण्यापूर्वी योग्य दिशा विचारात घेतली पाहिजे. घरात गायीची मूर्ती ठेवण्याचे वास्तू तत्व जाणून घेऊया...**

वास्तुशास्त्रानुसार, कामधेनू गायीची मूर्ती घरात योग्य दिशेने ठेवणे खूप महत्वाचे आहे. चुकीच्या ठिकाणी ठेवल्याने प्रतिकूल परिणाम होऊ शकतात. कामधेनू गाय ही देवी लक्ष्मीचे प्रतीक मानली जाते. वास्तुशास्त्रानुसार, आग्नेय दिशेने ठेवणे सर्वोत्तम मानले जाते, कारण ही दिशा शुक्र ग्रहाशी संबंधित आहे. म्हणून, या ठिकाणी पितळी गायीची मूर्ती ठेवल्याने घरात सुख, समृद्धी आणि शांती मिळते.

- घराच्या हॉलमध्ये गायीची मूर्ती ठेवा : वास्तूनुसार, तुम्ही हॉलमध्ये किंवा ड्रॉइंग रूममध्ये गायीची मूर्ती ठेवू शकता. असे केल्याने सकारात्मक वातावरण निर्माण होते आणि ते जोडप्यासाठी देखील शुभ मानले जाते. म्हणून, विवाहित जोडप्यांनी त्यांच्या घरात गायीची मूर्ती निश्चितच ठेवावी. यामुळे परस्पर प्रेम वाढते आणि त्यांच्या वैवाहिक जीवनात गोडवा टिकून राहतो.
- प्रार्थना कक्षात गायीची मूर्ती ठेवा : वास्तुशास्त्र आणि ज्योतिषशास्त्रात, पूजास्थान हे घरातील सर्वात पवित्र स्थान मानले जाते. कामधेनू गाय ही देवी लक्ष्मीचे प्रतीक आहे. म्हणून, तुम्ही प्रार्थना कक्षात गायीची मूर्ती देखील ठेवू शकता. असे केल्याने अत्यंत शुभ परिणाम मिळतात आणि ती घरात ठेवल्याने मुलांसाठी देखील शुभ मानले जाते. एकाग्रता वाढते असे मानले जाते.
- कामधेनू गाय ठेवण्यापूर्वी या गोष्टी जाणून घ्या : कामधेनू गायीची मूर्ती कधीही बेडरूम, बाथरूम किंवा इतर ठिकाणी ठेवू नये असे मानले जाते. वास्तु तज्ज्ञ म्हणतात की असे केल्याने नकारात्मक परिणाम होऊ शकतात. ती नेहमी स्वच्छ ठिकाणी ठेवावी. जर तुम्ही तुमच्या घरात पितळेची मूर्ती ठेवत असाल तर ती आग्नेय दिशेने ठेवावी. यामुळे घरात आनंददायी वातावरण राहील.

# शिवसेना पक्ष आणि चिन्ह कुणाचं? दोन्ही गट अंतिम युक्तिवादासाठी तयार, पण कोर्टाकडून पुन्हा पुढची तारीख




**मुंबई (प्रतिनिधी)** – गेल्या तीन वर्षांपासून सुरू असलेल्या शिवसेना पक्ष आणि चिन्हाच्या निकालाला अद्याप मुहूर्त लागत नसल्याचं चित्र आहे. गुरूवारी या प्रकरणाची सुनावणी सर्वोच्च न्यायालयात पार पडली. त्यानंतर आता या याचिकेवर सुनावणी पुढच्या तारखेला होणार आहे. ती सुनावणी नेमक्या कोणत्या तारखेला होणार आहे हे मात्र अद्याप निश्चित नसून सर्वोच्च न्यायालयाकडून ते दोन्ही पक्षकारांना नंतर सांगण्यात येणार असल्याची माहिती आहे.

शिवसेना पक्षाचं नाव आणि चिन्हासंदर्भात सर्वोच्च न्यायालयातील गुरुवारची सुनावणी संपली. या दरम्यान, शिवसेनेकडून ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी युक्तिवाद केला. शिवसेनेच्या दोन्ही गटांकडून म्हणजे ठाकरे आणि शिंदे गटाकडून अंतिम युक्तिवादाची तयारी दर्शवण्यात आली आहे. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने आता त्यावर पुढच्या तारखेला सुनावणी होईल असं स्पष्ट केलं आहे.

शिवसेनेच्या अंतिम युक्तिवादासाठी पुढची तारीख ही उपलब्धतेनुसार देण्यात येईल असं सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केलं आहे. दोन्ही बाजूंचा लेखी युक्तिवाद वाचून पुढील तारीख निश्चित करणार असल्याचं सर्वोच्च न्यायालयाकडून स्पष्ट करण्यात आलं आहे.

शिवसेना पक्ष आणि या पक्षाचं निवडणूक चिन्ह असलेला धनुष्यबाण कोणाचा, या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. २०२२ साली एकसंध शिवसेनेतून फुटलेल्या एकनाथ यांचा पक्ष हाच खरा शिवसेना पक्ष असल्याच्या आणि त्यांना धनुष्यबाण हे चिन्ह वापरण्यास मुभा देणाऱ्या केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्णयाला उद्धव ठाकरे यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं आहे.

जून २०२२ मध्ये शिवसेनेत फुट पडली, जेव्हा एकनाथ शिंदे यांनी पक्षातील ४० आमदारांसह बंडखोरी केली. यामुळे महाविकास आघाडी सरकार कोसळले आणि शिंदे यांनी भाजपच्या समर्थनाने नवीन सरकार स्थापन केले. फेब्रुवारी २०२३ मध्ये, निवडणूक आयोगाने शिवसेना पक्षाचे नाव आणि धनुष्यबाण हे निवडणूक चिन्ह एकनाथ शिंदे गटाला दिले. यामुळे उद्धव ठाकरे गटाला मोठा धक्का बसला. ठाकरे गटाला शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) हे नाव आणि मशाल हे नवीन चिन्ह देण्यात आले.

–उद्धव ठाकरे गटाने निवडणूक आयोगाच्या या निर्णयाविरोधात २२ फेब्रुवारी २०२३ रोजी सर्वोच्च न्यायालयात विशेष याचिका दाखल केली. या याचिकेत त्यांनी शिवसेना नाव आणि धनुष्यबाण चिन्हावर दावा केला.

–ठाकरे गटाने असा युक्तिवाद केला की, निवडणूक आयोगाचा निर्णय चुकीचा आहे आणि पक्षाची मूळ ओळख धनुष्यबाण चिन्हाशी जोडलेली आहे, ज्यामुळे मतदारांमध्ये गोंधळ होऊ शकतो. – सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाच्या निर्णयाला स्थगिती देण्यास नकार दिला, परंतु पूर्ण निकालापर्यंत शिंदे गटाला चिन्हाचा तात्पुरता वापर करण्याची परवानगी दिली.

# एकीकडे उष्णतेची लाट, दुसरीकडे विदर्भ, मराठवाड्यामध्ये विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता

पुणे: महाराष्ट्रात सध्या उन्हाची तीव्रता कमालीची वाढली असून बहुतांश जिल्ह्यांमध्ये हवामान कोरडे आणि उष्ण आहे. किनारपट्टीच्या भागात उकाडा आणि दमटपणा जाणवत असून, काही ठिकाणी उष्णतेच्या (चरहरीरीहींर थशरींहशी णविरींश) लाटेचा प्रभाव आहे. पुढील दोन दिवस पावसाची शक्यता नसली, तरी १३ आणि १४ मार्च रोजी विदर्भ, मराठवाडा आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रात विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस पडण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

मुंबई, ठाणे, पालघरसह संपूर्ण कोकण पट्ट्यात उष्ण आणि दमट वातावरण कायम राहील. आज पाऊस पडण्याची शक्यता नसून, काही भागांत उष्णतेची लाट जाणवू शकते. पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर आणि अहमदनगरमध्ये तापमानाचा पारा वाढला आहे. आज जरी पावसाची चिन्हे नसली, तरी १४ मार्चपासून काही ठिकाणी हलक्या सरी कोसळू शकतात. आज हवामान कोरडे राहील, मात्र १३-१४ मार्चला विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता आहे.

तर पुण्यासह संपूर्ण महाराष्ट्रात तापमानात लक्षणीय वाढ होत असल्याची माहिती पुणे वेधशाळेचे शास्त्रज्ञ सखा सानप यांनी दिली आहे. वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी घराबाहेर पडताना योग्य काळजी घ्यावी, असे आवाहनही करण्यात आले आहे. राज्यात सध्या अकोला जिल्ह्यात सर्वाधिक ४१ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. तर पुण्यात आज ३९ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. मुंबईसह समुद्रकिनारपट्टी भागातही तापमानात मोठी वाढ झाली आहे. काही भागांमध्ये पहाटेच्या सुमारास प्रदूषणामुळे धुक्यासारखी चादर पसरलेली दिसून आली. मात्र यामुळे कोणताही धोका नसून नागरिकांनी घाबरण्याची गरज नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. विदर्भात तापमान ४० अंश सेल्सिअस पर्यंत पोहोचले आहे. पुढील दोन दिवसांत मुंबई आणि कोकण परिसरात उष्णतेची लाट येण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. सध्या गुजरात आणि महाराष्ट्र या भागात प्रतिचक्रवर्ती परिस्थिती निर्माण झाल्यामुळे उन्हाचा तडाखा अधिक जाणवत आहे. त्यामुळे राज्यातील अनेक भागांत तापमान वाढले आहे.

मात्र राज्यात सर्वत्र उष्णतेची लाट नसून विदर्भ आणि कोकणात काही प्रमाणात उष्णतेची लाट जाणवण्याची शक्यता आहे. तसेच १४ मार्चनंतर विदर्भ आणि मराठवाडा या भागांमध्ये विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. ही माहिती पुणे वेधशाळेचे हवामानतज्ज्ञ सखाराम सानप यांनी दिली असून याबाबत अधिक माहिती आमच्या प्रतिनिधींनी त्यांच्याकडून जाणून घेतली.

# मीरा भाईंदरमधील स्टॅम्प ड्यूटी गैरव्यवहार प्रकरणांमध्ये १३३ कोटींची वसुली

**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्यातील स्टॅम्प ड्यूटी गैरव्यवहाराशी संबंधित प्रकरणांमध्ये आतापर्यंत मोठ्या प्रमाणावर कारवाई करण्यात आली असून मीरा भाईंदर मधील स्टँप ड्युटी गैरव्यवहार प्रकरणी सुमारे १३३ कोटी रुपयांची वसुली करण्यात आल्याची माहिती महसूल राज्यमंत्री योगेश कदम यांनी विधानसभेत दिली.

महसूल विभागाच्या अर्थसंकल्पावरील मागण्यांवरील चर्चेला उत्तर देताना राज्यमंत्री कदम म्हणाले की, मीरा भाईंदर मधील स्टँप ड्यूटीच्या ४९२ प्रकरणांची चौकशी सुरू करण्यात आली असून त्यापैकी ३५० प्रकरणांमध्ये अंतिम आदेश देण्यात आले आहेत. उर्वरित १४२ प्रकरणांची चौकशी सुरू असून त्यावर लवकरच अंतिम निर्णय घेतला जाईल. या प्रकरणांमध्ये आतापर्यंत सुमारे ३५ कोटी रुपयांची स्टॅम्प ड्यूटी आणि जवळपास ९८ कोटी रुपयांचा दंड आकारण्यात आला असून संबंधितांना नोटिसाही देण्यात आल्या आहेत. या प्रकरणांची अधिक सखोल चौकशी करण्यासाठी नोंदणी उप महानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, छत्रपती संभाजीनगर यांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती गठीत करण्यात आली आहे. समितीचा अहवाल आल्यानंतर दोषींवर पुढील कारवाई करण्यात येईल, असेही कदम यांनी स्पष्ट केले. चारकोप येथील कांदळवन क्षेत्रातील कथित अतिक्रमणाबाबत ४८ तासांत जागेची पाहणी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश तहसीलदारांना देण्यात आले आहेत. जर तेथे बेकायदेशीर बांधकाम आढळले, तर त्याचे तात्काळ निष्कासन करण्याचे आदेश दिले जातील, असेही राज्यमंत्री कदम यांनी सांगितले.

तसेच रायगड, पालघर आणि ठाणे जिल्ह्यांशी संबंधित मुद्द्यांवरही मंत्रिमंडळ स्तरावर बैठक घेऊन चौकशीचे आदेश देण्यात आले असल्याचे त्यांनी नमूद केले. अधिवेशनादरम्यान सदस्यांनी मांडलेल्या मतदारसंघाशी संबंधित प्रश्नांची लेखी उत्तरे दोन महिन्यांत दिली जातील, असेही त्यांनी सांगितले.

# वन्यप्राणी-मानव संघर्ष रोखण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर- वन मंत्री गणेश नाईक

**मुंबई (प्रतिनिधी)** – वाघ व बिबट्यांचे हल्ले, वन्यप्राणीमानव संघर्ष आणि वनसंवर्धनाच्या उपाययोजनांसाठी तंत्रज्ञानाचा वापर करुन विविध उपाययोजना राबविण्यात येणार असल्याची माहिती वन मंत्री गणेश नाईक यांनी विधानसभेत दिली.

अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधानसभा सदस्यांनी वन विभागासंदर्भातील उपस्थित केलेल्या चर्चेला उत्तर देताना वन मंत्री गणेश नाईक यांनी सांगितले की, राज्यात वाघ-बिबट्यांच्या हल्ल्यांवर नियंत्रण, त्यांचे संरक्षण आणि लोकांच्या सुरक्षिततेसाठी सॅटेलाईट व आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) तंत्रज्ञानाचा वापर करून आधुनिक उपाययोजना राबविण्यात येणार आहेत. यासाठी वन विभागाला जमीनीच्या बदल्यात मिळणारा निधी, 'एमडीएस'मधून उभारण्यात येणारे कर्ज आणि इतर स्रोतांद्वारे मिळून सुमारे १४ हजार कोटी रुपये उपलब्ध होतील.

चर्चेत वाघ-बिबट्यांचा प्रादुर्भाव, वनपट्टे, वनउद्यान उभारणी, वनजमिनीवरील अतिक्रमण, तसेच वन्यप्राणी हल्ल्यातील पीडित कुटुंबांना मदत अशा विविध विषयांवर सदस्यांनी प्रश्न उपस्थित केले. त्यावर उत्तर देताना वन मंत्री नाईक म्हणाले की, वन विभागाबाबत लोकांच्या भावना सकारात्मक होत आहेत. राज्यातील २१ टक्के क्षेत्र वनाखाली असून ते ३३ टक्क्यांपर्यंत वाढविण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. सामाजिक वनीकरणाच्या माध्यमातून लोकसहभाग वाढवून मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड केली जात आहे. राज्य सरकारने ३०० कोटी झाडे लावण्याचा संकल्प केला असून यावर्षी १० कोटी झाडे लावण्यात आली आहेत. पुढील वर्षांत ही संख्या वाढवत नेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# संगणक परिचालकांचे मानधन १५ हजार होणार; कंत्राटी पद्धत हटवून थेट मानधन देण्याबाबत सरकार सकारात्मक



**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्यातील ग्रामपंचायती आणि जिल्हा परिषदांमध्ये गेल्या १२ वर्षांपासून कंत्राटी तत्त्वावर काम करणाऱ्या २२,००० संगणक परिचालकांच्या प्रलंबित प्रश्नांवर आज विधान परिषदेत जोरदार चर्चा झाली. भाजप आमदार उमा खापरे आणि प्रवीण दरेकर यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तर देताना, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी परिचालकांच्या मानधनात ५,००० रुपयांची वाढ करण्याचा प्रस्ताव विचाराधीन असल्याचे सांगत, कंत्राटी कंपन्यांना वगळून थेट मानधन देण्याबाबत सरकार पर्याय शोधत असल्याची ग्वाही दिली.

चर्चेची सुरुवात करताना आमदार उमा खापरे यांनी संगणक परिचालकांच्या समस्यांचा पाढा वाचला. वाढत्या महागाईच्या काळात १० हजार रुपये मानधनावर घर चालवणे अशक्य आहे. त्यातच हे मानधन वेळेवर मिळत नसल्याने अनेक कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली आहे, असे त्या म्हणाल्या. महिला परिचालकांना मातृत्व रजा नाही, पीएफ (झऋ), विमा किंवा वैद्यकीय सुविधांचा अभाव आणि एकाच व्यक्तीवर अनेक विभागांच्या कामाचा अतिरिक्त ताण, अशा गंभीर मुद्द्यांकडे त्यांनी सरकारचे लक्ष वेधले. महिला कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षित वातावरण आणि रजेचे ठोस धोरण आखण्याची मागणी त्यांनी केली.

'कंत्राटी कंपन्यांना हटवा आणि मानधन १५ हजार करा' – प्रवीण दरेकर

आमदार प्रवीण दरेकर यांनी या प्रश्नावर आक्रमक भूमिका घेत मधल्या कंत्राटी कंपन्यांवर (उेपीींरलीीं) कडाडून टीका केली. मधल्या कंपन्या मोठे कमिशन लाटतात आणि प्रत्यक्ष काम करणाऱ्यांच्या पदरात कमी पैसे पडतात. ही कंत्राटी पद्धत कायमची बंद करून परिचालकांची नियुक्ती थेट 'महाराष्ट्र आयटी महामंडळ' किंवा शासनाच्या यंत्रणेमार्फत करावी, अशी मागणी त्यांनी केली. तसेच, मानधन तातडीने १५,००० रुपये करण्याची आणि जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर सुरू असलेल्या आंदोलनांची सरकारने दखल घेण्याची विनंती त्यांनी केली.

# नवजात बालकांची विक्री; शासन कठोर कायदा करणार

**मुंबई (प्रतिनिधी)** – मुंबई शहर आणि उपनगरातील दाट लोकवस्तीच्या भागांमध्ये नवजात बालकांची विक्री करणाऱ्या टोळ्या मोठ्या प्रमाणावर सक्रिय झाल्या असून, या गंभीर प्रकरणाची दखल आता राज्य सरकारने घेतली आहे. विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासाला शिवसेना (ठाकरे गट) आमदार मिलिंद नार्वेकर यांनी गोवंडी आणि मानखुर्द परिसरातील अशा टोळ्यांवर होणाऱ्या कारवाईबाबत प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाला उत्तर देताना गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी स्पष्ट केले की, काही टोळ्या खासगी व सरकारी प्रसूतीगृहे तसेच आयव्हीएफ केंद्रांमधून बालकांच्या जन्माची माहिती मिळवून, आर्थिक आमिष दाखवून पालकांना बालकांची विक्री करण्यास प्रवृत्त करतात. यामध्ये काही रुग्णालयीन कर्मचाऱ्यांचाही सहभाग असल्याचे निदर्शनास आले आहे.

या अनैतिक व्यापाराला पूर्णपणे आळा घालण्यासाठी सरकार आता एका कठोर कायद्याचा विचार करत असल्याचे आश्वासन मंत्री कदम यांनी दिले. या योजनेचा एक भाग म्हणून, प्रसूतीगृहांमधील नोंदणी प्रक्रियेत अधिक गोपनीयता राखली जाईल आणि यासाठी एक स्वतंत्र पोर्टल विकसित केले जाईल, जेणेकरून माहितीची गळती होणार नाही. विशेष म्हणजे, आमदार नार्वेकर यांनी मांडलेल्या सूचनेनुसार, जर एखादा मुख्य आरोपी अटक झाल्यानंतरही त्याचे कुटुंबीय हाच बेकायदेशीर व्यवसाय पुढे चालू ठेवत असतील, तर केवळ आरोपीवरच नाही तर त्याच्या संपूर्ण कुटुंबावर कठोर कायदेशीर कारवाई करण्याबाबत सरकार कायद्याचा सखोल अभ्यास करून निर्णय घेईल, असेही मंत्र्यांनी यावेळी स्पष्ट केले.

# राजधानीत यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त निवासी आयुक्त तथा सचिव आर. विमला यांनी कोपर्निकस मार्ग येथील जुने महाराष्ट्र सदन येथे त्यांच्या प्रतिमेस आणि कस्तुरबा गांधी मार्ग येथील महाराष्ट्र सदनातील यशवंतराव चव्हाण यांच्या पुतळ्यास पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी महाराष्ट्र परिचय केंद्राचे संचालक हेमराज बागुल, सहायक निवासी आयुक्त नितीन शेंडे, स्मिता शेलार, जनसंपर्क अधिकारी मनीषा पिंगळे, सहायक लेखाधिकारी निलेश केदारे आणि महाराष्ट्र सदनाचे व्यवस्थापक प्रमोद कोलपते यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी व्यवस्थापक प्रमोद कोलपते यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या महाराष्ट्राच्या विकासातील आणि देशाच्या जडणघडणीतील ऐतिहासिक योगदानाचा परिचय करून दिला.

## Change In Name

My Old Name is **BABU SALAVE** which now I am changing as New Name **SALAVE BABURAO KESHAVRAO.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address - H.No. 1-7-789, Samata Nagar, Pawadewadi Naka, Nanded 431602**
**Parment Address - H.No. 1-7-789, Samata Nagar, Pawadewadi Naka, Nanded 431602**
**Mo.No. 9421765440**

## जाहीर प्रगटन

मा. श्रीमती ए.टी. गित्ते, दिवाणी न्यायाधीश क. स्तर नायगांव यांच्या न्यायालयात

दिवाणी किरकोळ अर्ज ३१/२०२६
वर्षा शिंदे व इतर २ वि. निरंक

अर्जदार:-
१. शेषाबाई भ्र. भीमराव शिंदे, वय :५३ वर्षे, धंदा : घरकाम रा. रूई ता. नायगांव जि. नांदेड
२. आशाताई भ्र. सदाशिव देगलुरे, वय :३३ वर्षे, धंदा : घरकाम रा. रामतिर्थ ता. बिलोली जि. नांदेड
३. गोदावरी भ्र. बालाजी शिंदे, वय :२९ वर्षे, धंदा : घरकाम रा. दरेगांव ता. नायगांव खै. जि. नांदेड
४. प्रल्हाद पिता भिमराव शिंदे, वय :२५ वर्षे, धंदा : शिक्षक रा. रूई बु. ता. नायगांव जि. नांदेड

विरुध्द
श्रीमान शाखाधिकारी साहेब,
मार्फत महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा कृष्णुर ता. नायगांव जि. नांदेड

दावा:- कलम ३७२भारतीय वारसा कायदयाप्रमाणे वारसाहक्क प्रमाणपत्र मिळणेबावत.

ज्याअर्थी अर्जदारांनी या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. मयत भिमराव नारायण शिंदे यांचा मृत्यू दिनांक २१/०३/२०२३ रोजी झाला आहे. मयत भिमराव नारायण शिंदे यांची अर्जदार क्र.१ ही पत्नी व अर्जदार क्र.२ ते ३ मुली असुन अर्जदार क्र. ४ मुलगा आहे. मयत भिमराव नारायण शिंदे यांच्या नावे मौजे कृष्णुर येथील महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा:कृष्णुर ता. नायगांव जि. नांदेड यांच्याकडील खाते क्र.५४१२५००८८४८ मध्ये रूपये ४७,९१३/- (अक्षरी सत्तेचाळीस हजार नऊशे तेरा रूपये केवळ) जमा आहेत. उपरोक्त रक्कम अर्जदार यांना मिळावी म्हणून या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे.

तरी, प्रस्तुत प्रकरणी अर्जदारांच्या नांवे वारसाहक्क प्रमाणपत्र देण्यास कोणांस काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः हजर राहून या न्यायालयात दिनांक ०६/०४/२०२६ रोजी किंवा हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत नोंदवावा. मुदतीनंतर येणा-या आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिला.

आदेशावरून,
कनिष्ठ लिपिक, दिवाणी न्यायालय क.स्तर, नायगांव.
स. अधिक्षक, दिवाणी न्यायालय क.स्तर, नायगांव

## जाहीर प्रगटन

हिमायतनगर येथील दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, यांचे न्यायालयात हिमायतनगर, जि. नांदेड.

**नियमित दिवाणी दावा क्रमांक:- ४१ / २०२५.**

**नंदकिशोर जिल्हावार विरुद्ध विशाल आंदेगावकर व इतर.**

हिमायतनगर येथील दिवाणी न्यायालयात नंदकिशोर अंबादास जिल्हावार यांनी, प्रतिवादी क्रमांक १. **विशाल पि. मारोती आंदेगावकर.**, वय:- ४० वर्ष; व्यवसाय:- व्यापार., रा. आंदेगाव (भुरकवाडी), ता. हिमायतनगर; जि. नांदेड. **तसेच विशाल पि. मारोती आंदेगावकर.**, वय:- ४० वर्ष; व्यवसाय:- व्यापार.,रा. द्वारा विके इंटरप्रायजेस, वर्कशॉप, पाण्याच्या टाकीजवळ, नांदेड., ता. व जि. नांदेड विरुद्ध रक्कम वसुलीचा दावा दाखल केला आहे.

ज्याअर्थी उपरोक्त दाव्यातील वादी नंदकिशोर अंबादास जिल्हावार यांनी आपल्या विरुद्ध निशाणी क्रमांक ०८ वर प्रकरण दाखल केले आहे. प्रस्तुत प्रकरणात आपणास प्रतिवादी क्रमांक १ केले आहे. सदर प्रकरणात आपणास अनेक वेळा या न्यायालया तर्फे अर्जात नमूद केलेल्या पत्यावर समन्स तसेच नोंदणीकृत टपालाद्वारे समन्स पाठविण्यात आले होते. परंतु असे दिसून येत आहे की, नमूद पत्यावर आपण मिळून येत नाहीत किंवा आपण जाणूनबुजून नोंदणीकृत टपालाद्वारे समन्स स्विकारण्यास टाळाटाळ करीत आहात. याअर्थी उपरोक्त प्रकरणात आपल्या नावे हे जाहीर समन्स पाठविण्यात येत असून आपणास याद्वारे सूचित करण्यात येते की, आपण स्वताः अगर वकीला मार्फत **दिनांक२२/०४/२०२६** रोजी ठीक सकाळी ११.००वरील प्रकरणात हजर राहून आपली बाजू मांडावी अन्यथा आपणास या प्रकरणात काही सांगायचे नाही असे समजून प्रकरणात आपल्या विरुद्ध एकतर्फा निकाल देण्यात येईल.

आज **दिनांक११/०३/२०२६** रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

आदेशावरून
कनिष्ठ लिपिक
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, हिमायतनगर.

## जाहीर प्रगटन

**विषयः-** जाहीर प्रगटनाव्दारे नोटीस

**अपीलार्थी** –
1. सुभाष किशनराव जाधव रा. देगलूर
2. सुभाष किशनराव जाधव रा. देगलूर
3. संतोष बाबुराव ईबितवार रा. देगलूर
4. संभाजीराव मलबा भंडारे रा. देगलूर
5. मंदाकिनी नारायणकुमार मुळे रा. देगलूर
6. श्रीमती धनश्री संजय कुसुमकर रा. देगलूर

**विरुध्द**

**उत्तरार्थी** -
1. राजरेड्डी श्रीनीवास लोकावार रा. शहापूर ता. देगलूर
2. अशोक तुळशीराम जाधव रा. गवंडगाव ता. देगलूर

**प्रकरणः** महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 चे कलम 247 अन्वये अपील...

ज्याअन्वये उत्तरार्थी क्र. 1 व 2 यांना कळविण्यात येते कि, वरील अपीलार्थी क्र. 1 ते 6 यांनी या कार्यालयात अपील प्रकरण क्रमांक 04/2026, 05/2026, 06/2026, 07/2026, 08/2026, 09/2026 दाखल केले असून, त्यात आपणांस नोटीस तामिलीसाठी पाठविण्यात आलेली आहे. परंतू सदर प्रकरणात आपण अद्यापपावेतो हजर झालेले नाहीत.

करिता, याव्दारे सर्व उत्तरार्थी यांना कळविण्यात येते की, वर दर्शविलेल्या कार्यवाहीच्या सुनावणीसाठी **दिनांक 17/03/2026** हा दिवस नियुक्त करण्यात आला आहे. तरी आपण स्वतः किंवा वकिलामार्फत सर्व अभिलेखासहित वरील तारखेस या कार्यालयात मा. उपविभागीय अधिकारी देगलूर यांचेसमोर **दुपारी 03:00** वाजता उपस्थित रहावे. उक्त तारखेस उपस्थित न राहिल्यास आपली कोणतीही सबब विचारात न घेता कार्यवाहीचा निकाल दिला जाईल.

(अनुप पाटील)
**उपविभागीय अधिकारी देगलूर**

## जाहीर प्रगटन

मी माधव रंगनाथ फाजगे रा.लोहा.ता.लोहा जि.नांदेड येथील असून या जाहीर प्रकटनाद्वारे सर्व जनतेस कळवितो की विश्वनाथ रावजी देसाई रा. चुडावा ता. पूर्णा जि. परभणी यांच्या मालकी व ताब्यातील शेत जमीन सर्वे क्रं.८८ यातील शेत जमीन ५ गुठे त्याची चतुर्थ सीमा खालील प्रमाणे. पूर्वेस-विश्वनाथ रावजी देसाई यांचे शेत

पश्चिमेस-भागवत विश्वनाथ देसाई यांची शेती

दक्षिणेस-पूर्णा -नांदेड रोड

उत्तरेस -देवराव सखाराम देसाई यांची शेत यातील सदरील चतुर्थ सीमा आतील शेत जमीन सौदाचीठु आधारे विकत घेण्याचा करार केला असून बयानापोटी काही रक्कम दिली आहे तरी वरील सदरील जमिनी बाबत कुणास काही आक्षेप उजर ,मालकी हक्क, देवाणघेवाण, कुळकर्ज असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत आमच्याकडे कागदपत्राद्वारे आक्षेप दाखल करावा मुदत संपल्यानंतर कुणाचाही आक्षेप नाही असे समजून या शेत जमिनीची रजिस्ट्री करण्यात येईल असे या प्रगटनाद्वारे प्रसिद्ध करीत आहोत.

**जाहीर प्रगटन देणार**
**माधव रंगनाथ फाजगे**
**रा.लोहा.ता.लोहा.जि.नांदेड**

## गुणपत्रक व सनद हरवले आहे

माझी दिपाली नारायण गायकवाड या नावाचे दहावी पास सनद,गुणपत्रिका व बारावी विज्ञान शाखा पास गुणपत्रिका व कागदपत्रे १६ फेब्रुवारी २०२६ रोजी गोपाळ चावडी ते ढवळे कॉर्नर ते एमआयडीसी मार्ग नायगाव टो प्रवासात हरवली आहेत,कोणास सापडल्यास खालील मोबाईल वर **संपर्क साधावा.**
**मोबाईल नंबर ८८०६९८८१५७**

## जाहीर प्रगटन

मी माधव रंगनाथ फासगे रा.लोहा ता लोहा जि.नादेड येथिल असुन या जाहिर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळतो की भागवत विश्वनाथ देशाई रा. चुडावा तालुका पूर्णा जिल्हा परभणी यांच्या मालकी व ताब्यातील शेती सर्वे क्र.८९ यातिल शेत जमिन ३६ गुठे त्याची चेर्तुथ सीमा सिमा खालील प्रमाणे

पूर्वीस-विश्वनाथ रावजी देसाई यांचे शेत

पश्चिमेस-गुलाब विश्वंभर देसाई यांचे शेत

दक्षिणेश-पूर्णा- नांदेड रोड

उत्तरेस-देवराव संखाराम देसाई यांचे शेत यातील सदरील चतुर्थी सीमाआतील शेतजमीन सौदा चिट्टी आधारेआधारे विकत घेण्याचा करार केला असून भयाणा पोटी काही रक्कम दिली आहे तरी वरील सदरील जमिनीबाबत कुणास काही आक्षेप उजर ,मालकी, हक्क देवाण-घेवाण, कुळकर्ज असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत आमच्याकडे कागदत्राद्वारे आक्षेप दाखल करावा मुदत संपल्यानंतर पुन्हा काही आक्षेप नाही असे समजून या शेत जमिनीची रजिस्टी करण्यात येईल असे या प्रगटनाद्वारे प्रसिद्ध करीत आहोत

**जाहीर- प्रगटन देणार**
**माधव रंगनाथ फाजगे,**
**रा.लोहा ता.लोहा.जि.नांदेड**


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




# नांदेड-अर्धापूर महामार्गावर 'इंटेलिजेंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टम' उभारा!

## खा. अशोकराव चव्हाण यांची केंद्रीय मंत्री नितीन गडकरींकडे मागणी



**नांदेड(प्रतिनिधी)** -राष्ट्रीय महामार्गावर नांदेड शहर ते अर्धापूर दरम्यान अपघातांचे वाढते प्रमाण लक्षात घेता या भागात 'इंटेलिजेंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टम' आणि सीसीटीव्ही पाळत ठेवणारी यंत्रणा कार्यान्वित करावी, अशी मागणी माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन केली आहे.

सदर महामार्गावरील सतत होणारे अपघात व जीवित हानी लक्षात घेता ही अत्याधुनिक यंत्रणा उभारण्याची आवश्यकता खा. अशोकराव चव्हाण यांनी व्यक्त केली असून, याबाबत त्यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याशी विस्तृत चर्चा केली. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत येणारा अर्धापूर जवळील पार्डी मक्ता टोल प्लाझा ते नांदेड शहरातील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ प्रवेशद्वारापर्यंत ३३ किलोमीटरचा रस्ता सध्या अत्यंत अपघातप्रवण झाला आहे. या मार्गावरील वाहनांची वाढती संख्या आणि अलीकडच्या काळात झालेले अनेक गंभीर अपघात पाहता वाहतूक नियंत्रणासाठी व आपत्कालीन परिस्थितीत तातडीने मदत उपलब्ध करून देण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे काळाची गरज असल्याचे खा. चव्हाण यांनी यावेळी सांगितले.

'इंटेलिजेंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टम' आणि सीसीटीव्ही यंत्रणा उभारल्यानंतर वाहतुकीवर २४ तास सतत नियंत्रण व देखरेख, अतिवेगाने धावणारी वाहने व वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई, तसेच अपघात व वैद्यकीय आणीबाणीच्या प्रसंगी तातडीने मदत पोहोचवणे शक्य होईल, असे ते म्हणाले. खा. अशोकराव चव्हाण यांनी मांडलेल्या विषयाचे गांभीर्य लक्षात घेता केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी याबाबत लवकरच योग्य निर्णय घेण्यास अनुकूलता दर्शवली आहे.

## फळबागेला आग; शेतकऱ्याचे ४ लाखांचे नुकसान



**लोहा - (प्रतिनिधी)** -लोहा तालुक्यातील हिराबोरी तांडा येथील शेतकऱ्याच्या आंबा फळबागेला अचानक आग लागून शेतकऱ्यांचे ४ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.

लोहा तालुक्यातील मौजे हिराबोरी येथील शेतकरी बन्सीलाल सीताराम चव्हाण यांच्या हिराबोरी येथील गट क्रमांक ६२ या शेतीला दि. ९ मार्च रोजी अचानक आग लागली. या आगीत शेतीतील आंब्यांची झाडे जळून गेली. यात शेंद्री, केसर आंब्यांची लागवड शेतकऱ्याने मोठ्या मेहनतीने केली होती. या आंब्यांच्या उत्पनातून चांगले दिवस येतील अशी शेतकऱ्याला आशा होती, पण त्यांच्या या आशेवर पाणी फिरले. दि. ९ रोजी शेतात अचानक आग लागून आंब्याच्या झाडाबरोबरच या शेतकऱ्याच्या शेतातील बोअर व पाईपलाईनसुध्दा जळून खाक झाली आहे.

या संकटामुळे सदरील शेतकरी मोठ्या आर्थिक अडचणीत सापडला आहे. याबाबत आगपीडित शेतकरी बन्सीलाल सीताराम चव्हाण यांनी लोहा तहसीलदार, तालुका कृषी अधिकारी आदींना याबाबत नुकसान भरपाई मिळावी या मागणीचे निवेदन दिले आहे.

# शेतीच्या वादातून झालेल्या मारहाणीत शेतकऱ्याचा मृत्यू; पाच जणांना पोलीस कोठडी

**नायगाव बाजार (प्रतिनिधी)** - येथून जवळच असलेल्या बिलोली तालुक्यातील दुगाव येथे शेतीच्या वादातून झालेल्या मारहाणीत एका शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली. या प्रकरणी कुंटूर पोलिसांनी पाच आरोपींना ताब्यात घेतले असून, बुधवारी न्यायालयाने त्यांना पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. व्यंकट विठ्ठलराव जाधव (वय ५६, रा. दुगाव, ता. बिलोली, जि. नांदेड) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहिती-नुसार दुगाव येथील शेतकरी माधवराव जाधव यांच्या शेतात मंगळवार, दि. १० मार्च रोजी सकाळी अकराच्या सुमारास नांगरणीचे काम सुरू होते. यावेळी भावकीतील काही व्यक्तींमध्ये शेतीच्या हद्दीच्या कारणावरून वाद निर्माण झाला. सुरुवातीला झालेली बाचाबाची काही क्षणातच तीव्र झाली आणि त्याचे रूपांतर मारहाणीत झाले.

या वादादरम्यान आरोपींनी व्यंकट जाधव यांच्यावर लाथाबुक्क्यांनी तसेच काठ्यांनी बेदम मारहाण केल्याचे सांगण्यात येत आहे. या मारहाणीत ते गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने उपचारासाठी हलविण्यात आले. मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे दुगाव परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

या प्रकरणी माधवराव विठ्ठलराव जाधव रा. दुगाव, ता. बिलोली, जि. नांदेड यांनी कुंटूर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. फिर्यादीच्या तक्रारीवरून कुंटूर पोलिसांनी गुन्हा नोंदवून पाच आरोपींना ताब्यात घेतले.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये बालाजी गोविंद जाधव, ज्ञानेश्वर संजय जाधव, शैलेश संजय जाधव, संजय विठ्ठलराव जाधव आणि साईनाथ गोविंद कदम सर्व रा. दुगाव, ता. बिलोली, जि. नांदेड यांचा समावेश आहे. बुधवारी आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने त्यांना पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. दरम्यान या प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक विशाल भोसले करीत आहेत.

# जिल्ह्यातील शेतकरी व नागरिकांनी जिल्हा कृषी व धान्य महोत्सवात सहभागी व्हावे -जिल्हाधिकारी

## १५ ते १६ मार्चदरम्यान नवामोंढा येथील कृषी उत्पन्न बाजार समिती मैदानावर आयोजन; १०० स्टॉल्स, शेतकरी-शास्त्रज्ञ परिसंवाद व थेट शेतमाल विक्री

**नांदेड (प्रतिनिधी)** -कृषी विभाग व आत्मा, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा कृषी व धान्य महोत्सव २०२६ चे आयोजन १५ ते १६ मार्च २०२६ या कालावधीत सकाळी १० ते सायंकाळी ८ वाजेपर्यंत कृषी उत्पन्न बाजार समिती मैदान, नवा मोंढा, नांदेड येथे करण्यात आले आहे. या धान्य महोत्सवाचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

या कृषी महोत्सवात कृषी प्रदर्शन, कृषी विज्ञान केंद्र व कृषी विद्यापीठांचे स्टॉल, विविध कृषी तंत्रज्ञानाचे प्रदर्शन तसेच कृषी संलग्न शासकीय विभागांचे स्टॉल असे १०० स्टॉल्स उभारण्यात येणार आहेत. त्याचबरोबर विविध विषयांवरील शेतकरी-शास्त्रज्ञ परिसंवाद, चर्चासत्रे, उत्पादक ते ग्राहक थेट विक्री, कृषी मालाचे प्रदर्शन तसेच खरेदीदार-विक्रेता संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

या महोत्सवात जिल्ह्यातील शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या तसेच महिला आर्थिक विकास महामंडळाच्या महिला बचत गटांचा सक्रिय सहभाग राहणार आहे. महोत्सवाच्या ठिकाणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला गहू, ज्वारी, तांदूळ, तूर, मूग, उडीद, चनाडाळ, हळद, मिरची, मसाले तसेच गूळ, हळद पावडर, सेंद्रीय डाळी यांसारखी सेंद्रीय उत्पादने उपलब्ध राहणार आहेत.

तसेच मध, गुळाचा पाक, महिला बचत गटांची चटणी, लोणचे, पापड, कुरडई, टरबूज, खरबूज यांसारखी फळे व विविध भाजीपाला थेट विक्रीसाठी उपलब्ध राहतील. याशिवाय जात्यावरची सेंद्रीय डाळ, गोदाकाठची ज्वारी, सेंद्रीय हिरव्या भाज्या, फळभाज्या, रानफळे तसेच शेतकऱ्यांनी उत्पादित केलेले लाकडी घाण्याचे करडई, भुईमूग, जवस व तिळाचे तेल, बांबूपासून तयार केलेल्या वस्तू, केळीचे वेफर्स, डिंक व बिब्याची गोडंबी यांचे प्रदर्शन व विक्री होणार आहे. या महोत्सवाला जिल्ह्यातील नागरिक व शेतकऱ्यांनी भेट देऊन शेतमाल खरेदीद्वारे स्थानिक शेतकऱ्यांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी तथा प्रकल्प संचालक (आत्मा) दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे.

# 'हिंद दी चादर' नाट्य व गीतांचा उद्या सांस्कृतिक कार्यक्रम

**नांदेड (प्रतिनिधी)** -श्री गुरू तेग बहादूर साहेबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्ताने महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्यावतीने सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या मार्गदर्शनात 'हिंद दी चादर' या नाट्य व गीतांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन राज्यात आठ ठिकाणी करण्यात आले आहे. १४ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ६:३० वा. शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह, नांदेड येथे हा कार्यक्रम संपन्न होणार आहे.

नाट्यमय प्रसंग आणि गीत रचना अशा कलाविष्कारांनी युक्त ६० कलावंतांनी साकारलेला हा सांस्कृतिक सोहळा आहे. या 'हिंद दी चादर' सांस्कृतिक कार्यक्रमाचे राज्यात वाशी, मिरा रोड, नांदेड, छत्रपती संभाजीनगर, अकोला, नागपूर, नाशिक आणि पिंपरी चिंचवड या केवळ आठ ठिकाणी आयोजन करण्यात आलेले आहे.

'हिंद-दी -चादर' श्रीगुरु तेग बहादुरजी यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. त्यांनी धर्म स्वातंत्र्य, मानवता आणि सहिष्णुतेसाठी आपल्या प्राणांचे बलिदान दिले. त्यांचे जीवनकार्य संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी आहे. म्हणूनच त्यांना हिंद दी चादर (हिंदुस्थानचे रक्षण करणारी ढाल) असेही संबोधले जाते. म्हणूनच श्रीगुरू तेग बहादूर यांच्या शहिदीच्या ३५० व्या वर्षपूर्तीनिमित्त नागपूर, नांदेड आणि नवी मुंबई येथे स्मरण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. श्रीगुरू तेग बहादूर यांच्या बलिदानाची आठवण ठेवणे, त्यांच्या विचारांचा प्रसार करणे तसेच समाजात एकता, बंधुता आणि आध्यात्मिक मूल्यांचे संवर्धन करणे असा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश. जो विविध धर्म, संप्रदाय व समाजघटकांना एकत्र आणणारा, राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देणारा ठरणार आहे. हा सांस्कृतिक कार्यक्रम संपूर्णपणे विनामूल्य असून, नागरिकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन राज्य शासन व सांस्कृतिक कार्य विभागाच्यावतीने सांस्कृतिक कार्य विभाग संचालक श्रीराम पांडे यांनी केले आहे.

# ट्रॅक्टरमधील इंजिन चोरी करणारी टोळी जेरबंद; ८० लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)** -ट्रॅक्टरमधील इंजिन चोरी करणाऱ्या टोळीविरुद्ध मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत पोलिसांनी तीन ट्रॅक्टर इंजिन व दोन बॅटऱ्या जप्त केल्या असून, या प्रकरणी ८० लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

या प्रकरणी मुदखेड पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा क्रमांक ४४/२०२६ दाखल करण्यात आला असून, BNS २०२३ च्या कलम ३०३(२), ३(५) तसेच सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक कायदा कलम ४ व ८ (७) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिसांना ११ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता गुप्त माहिती मिळाली की, काही इसम ट्रॅक्टरमधील इंजिन चोरी करून त्यांची विक्री करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यानुसार पोलिसांनी तपास सुरू केला असता ११ मार्च रोजी सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास माळकौठा शिवारात ही चोरी झाल्याचे निष्पन्न झाले.

तपासादरम्यान पोलिसांनी संशयित आरोपींना ताब्यात घेऊन आरोपींकडून तीन ट्रॅक्टर इंजिन (७५ लाख रुपये) आणि दोन बॅटऱ्या (५ लाख रुपये) असा एकूण ८० लाखांचा मुद्देमाल आरोपींकडून जप्त करण्यात आला.

या प्रकरणी विनोद पाटील उबाळे (वय ३०, रा. मारतळा), विलास पाटील भरकडे (वय ३५), गजू पाटील हातणे (वय २८) आणि सतीश भरकडे (वय ३२) अशा आरोपींची नावे समोर आली आहेत. पुढील तपास मुदखेड पोलीस करत असून, चोरीच्या इतर घटनांशी आरोपींचा संबंध आहे का याचा शोध घेतला जात आहे. ही कारवाई पोलीस उपअधीक्षक रामेश्वर व्यंजने यांच्या मार्गदर्शनात



मुदखेडचे पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण, महसूल अधिकारी राजकुमार म्हसे, पोलीस उपनिरीक्षक शिवाजी शिंदे, पोलीस अंमलदार दिलीप चक्रधर, समदानी, जावेद यांनी केली. जप्त केलेला मुद्देमाल अवजड असल्याने जिलेटीनचा उपयोग करून जागीच नष्ट करण्यात आला आहे.

# महानगरपालिकेत यशवंतराव चव्हाण यांना अभिवादन



**नांदेड (प्रतिनिधी)** -आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार आणि राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची ११३ वी जयंती नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत साजरी करण्यात आली. यशवंतराव चव्हाण जयंतीनिमित्त महानगरपालिकेत गुरुवारी महापौर कविता मुळे यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी यशवंतराव चव्हाण यांच्या कार्याचे आणि विचारांचे स्मरण केले. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा पाया रचला. सहकार, शिक्षण, कृषी आणि औद्योगिक क्षेत्रांत त्यांनी घेतलेले निर्णय आजही राज्यासाठी मार्गदर्शक आहेत. सामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून त्यांनी केलेले 'बेरजेचे राजकारण' ही त्यांची मोठी ओळख असल्याचे उपस्थित मान्यवरांनी सांगितले.

याप्रसंगी नगसेवक प्रतिनिधी किशोर भवरे, उपआयुक्त नितीन गाढवे, उपआयुक्त अजितपालसिंग संधु, मुख्य उद्यान अधीक्षक डॉ. मिर्झा बेग, सहायक आयुक्त मो. गुलाम सादिक, सहायक आयुक्त मनिषा नरसाळे यांच्यासह मनपातील इतर कर्मचारी उपस्थित होते.

## 'यूपीएससीत' निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा १५ मार्च रोजी आंबेडकरवादी मिशनमध्ये सत्कार

**नांदेड (प्रतिनिधी)** -यूपीएससी २०२५ परीक्षेत निवड झालेल्या अधिकाऱ्यांचा सत्कार सोहळ्याचे आयोजन आंबेडकरवादी मिशन सिडको नांदेड येथे १५ मार्च सकाळी ११ वाजता करण्यात आले आहे. आयपीएस अतुल राजूरकर, आयएएस डॉ. ऋषिकेश पालीमकर, डॉ. प्रीतम भाले यांचा व त्यांच्या पालकांचा सत्कार करण्यात येणार आहे.

यावेळी जिल्हाधिकारी राहुल कार्डिले, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, सीईओ मेघना कावली, मराठा सेवा संघाचे कामाजी पवार, माजी शिक्षणसंचालक डॉ गोविंद नांदेडे, डॉ. यशवंत चव्हाण, आर. बी. मादले, संजय पाटील, उत्तम सोनकांबळे आदींची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तेव्हा विद्यार्थी व पालकांनी या सत्कार सोहळ्यास उपस्थित राहावे, असे आवाहन आंबेडकरवादी मिशनचे प्रमुख दीपक कदम यांनी केले आहे.

# नांदेडमध्ये अभाविपच्या विद्यार्थ्यांचा आक्रोश मोर्चा

## शिक्षणाच्या बाजारीकरणाविरोधात विद्यार्थी रस्त्यावर



**नांदेड (प्रतिनिधी)** - अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप) नांदेड शाखेचा विद्यार्थी आक्रोश मोर्चा गुरुवारी नांदेडच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला.

या मोर्चात विविध आयटीआय, वैद्यकीय, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये तसेच इतर शैक्षणिक संस्थांमधील शेकडो विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले होते. हा मोर्चा केवळ निदर्शन नसून महाराष्ट्रातील लाखो विद्यार्थ्यांच्या ज्वलंत प्रश्नांवर शासनाला जागे करण्याची ठाम आणि तीव्र हाक होती, असे आंदोलकांनी यावेळी सांगितले.

मोर्चादरम्यान विद्यार्थ्यांनी बॅनर-फलक घेऊन जोरदार घोषणाबाजी केली. 'उठ दोस्ता उगार मूठ, तूच थांबव तुझ्या शिक्षणाची लूट', अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. यावेळी अभाविपच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी यांना विविध मागण्यांचे निवेदन दिले.

या निवेदनात अभाविपने राज्यातील १४ प्रमुख शैक्षणिक समस्या मांडल्या. अतिवृष्टीग्रस्त भागातील विद्यार्थ्यांचे स्पर्धा परीक्षा शुल्क पूर्णतः माफ करावे व सर्व स्पर्धा परीक्षांचे शुल्क तत्काळ कमी करावे, विद्यार्थिनींच्या मोफत शिक्षणाची घोषणा प्रत्यक्षात अमलात आणावी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे येथील परीक्षा व निकालातील गोंधळ तत्काळ थांबवून वेळेवर गुणपत्रिका द्याव्यात, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातील रिक्त प्राध्यापक पदे भरावीत, परीक्षा शुल्क कमी करावे व इंटर्न्स/रेसिडेंट डॉक्टर्स यांना मानधन वाढवावे यासह अन्य काही मागण्या करण्यात आल्या.


शासनाने या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास राज्यभर विविध जिल्ह्यांत तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही देण्यात आला. अभाविप देवगिरी प्रदेश सहमंत्री दीपाली चित्ते म्हणाल्या, राज्यातील विविध विद्याशाखांतील विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहेत. परीक्षा शुल्कवाढ, शिष्यवृत्तीतील विलंब, रिक्त पदांमुळे गुणवत्तेवर होणारा परिणाम, तसेच ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांच्या अडचणी यामुळे शिक्षणव्यवस्था कमकुवत होत आहे. शासनाने विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे केवळ घोषणांच्या माध्यमातून पाहू नये, तर ठोस धोरणात्मक निर्णय घेऊन तात्काळ अंमलबजावणी करावी अन्यथा अभाविप राज्यव्यापी तीव्र आंदोलन उभारेल, असा इशाराही जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनान्वये दिला.

## पत्नीस मारहाण; पतीविरुद्ध गुन्हा

**नांदेड (प्रतिनिधी)**- बिलोली तालुक्यातील कासराळी येथे घरगुती कारणावरून पतीने पत्नीस जबर मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिली. विशेष म्हणजे या मारहाणीत पत्नीच्या डोळ्यास गंभीर दुखापत झाली असून तिच्यावर उपचार सुरू आहेत. ही घटना ११ मार्च रोजी सकाळी साडेआठ ते नऊच्या सुमारास घडली.

बिलोली तालुक्यातील कासराळी येथे राहणारी विवाहिता पूजा पिराजी ठक्करवाड (वय २८) हिला तिचे पती पिराजी सायलू ठक्करवाड याने घरगुती कारणावरून जबर मारहाण केली. या मारहाणीत तिच्या डोळ्यास गंभीर दुखापत झाली. जखमी पूजा ठक्करवाड हिच्या फिर्यादीवरून बिलोली पोलीस ठाण्यात पती पिराजी ठक्करवाड विरुद्ध गंभीर दुखापत केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस हवालदार मिरदोडे करत आहेत.

# दाभड येथे मोटारसायकल-क्रुझर फोर्सचा अपघात; २ तरुण गंभीर जखमी



**अर्धापूर (प्रतिनिधी)** -अर्धापूर-नांदेड रस्त्यावरील दाभड येथील आयचर शोरूमजवळ गुरुवार, दि. १२ मार्च रोजी सायंकाळी ४ वाजेच्या सुमारास क्रूझरफोर्स व दुचाकीचा अपघात झाला. या अपघातात दोन तरुण गंभीर जखमी झाले असून, त्यांना उपचारासाठी नांदेड येथे हलविण्यात आले आहे.

मोटारसायकलने नांदेडकडे जाणारे श्रेयस नारायण पवार (वय १७) रा. निवघा आणि श्रीराम बालाजी गिरे (वय २९) रा. सरेगाव ता. मुदखेड हे दोघे मोटारसायकलने नांदेडकडे जात होते. दाभड येथील आयचर शोरूमजवळ समोरून येणाऱ्या क्रूझर गाडी क्रमांक एम.एच.२६-सि.पी.८९४८ ने दुचाकीला जोराची धडक दिली. या धडकेत दोन्ही तरुण गंभीर जखमी झाले. श्रेयस पवार याचा पाय फॅक्चर झाला असून, श्रीराम गिरे यांनाही मोठी दुखापत झाली आहे. घटनेची माहिती मिळताच जगद्गुरु नरेंद्रचार्य रामानंदाचार्य नानीजधाम संस्थानच्या रुग्णवाहिकेचे चालक राजू पाचंगे यांनी तात्काळ रुग्णवाहिकेसह घटनास्थळी धाव घेतली. अपघाताची घटना घडताक्षणी स्थानिकांनी रुग्णवाहिकेला संपर्क साधला व जखमींना तात्काळ रुग्णालयात पाठविण्यासाठी कामगिरी केली. यावेळी मृत्युंजय गोविंद टेकाळे, गंगाधर टेकाळे, श्रीनिवास कदम आणि शुभम पावडे यांनी जखमींना रुग्णवाहिकेत चढवण्यासाठी आणि प्राथमिक मदत देण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. या अपघातामुळे अर्धापूर-नांदेड रस्त्यावरील वाहतूक विस्कळीत झाली होती.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com